। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २१८ वा । गुरूवार दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## महत्वाची न्युज

### मोटारसायकल - टेम्पो धडकेत जखमी होवून मृत्यु

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मयत नामे-शिवाजी पांडुरंग टेकाळे, वय ४५ वर्षे, खासापुरी नं २ ता.परंडा जि. धाराशिव हे दि.०५.०२.२०२५ रोजी मोटरसायकल वरुन जात होते. दरम्याना नारायण आगरकर यांचे शेताजवळ वळनावर खासापुरी रोडवर पिकअप क्र एमएच १४ जे.एल.७४०० चा चालक श्रीकृष्णा गंगाराम गोडगे, रा. आवाटी ता. करमाळा जि. सोलापुर चालकाने त्याचे ताब्यातील पिकअप चालवून शिवाजी टेकाळे यांचे मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात शिवाजी टोकळे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-आण्णा पांडुरंग टोकळे, वय ५३ वर्षे, खासापुरी नं २ ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१०.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### धाराशिव येथून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-मनोज अनिल सुतार, वय ३० वर्षे, रा. वाघोली ता. जि. धाराशिव यांची अंदाजे १५,००० किंमतीची टी व्ही एस मोटरसायकल पडवळ गॅरेज समोर पंजाब नॅशनल बॅंकच्या बाजुला धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनोज सुतार यांनी दि.१०.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### टिप्परची स्कुटीला धडक एकाचा मृत्यु

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मयत नामे-विश्वनाथ अंबादास पवार, वय ६६ वर्षे, रा.दत्तानगर सांजा गाव ता. जि. धाराशिव व सोबत जखमी मयुर आबाराव पवार, हे दोघे दि.०४.०२.२०२५ रोजी स्कुटी क्र एमएच एमएच २५ बी. ई. २१५६ वरुन जात होते. दरम्याना टिपर बी.एच.११३७ चा चालकाने त्याचे ताब्यातील टिपर हे चालवून मयुर पवार हे चालवत असलेले स्कुटीला पाठीमागुन धडक दिली. या अपघातात विश्वनाथ पवार हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-काका विश्वनाथ पवार, वय ३९ वर्षे, रा. दत्तनगर सांजा गाव ता. जि. धाराशिव यांनी दि.१०.०२.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम १०६(१),२८१, १२५(अ),१२५(बी) सह १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

## परळी वैजनाथ येथील 'अखिल भारतीय महापशुधन एक्स्पो २०२६'

# लोगोचे जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते अनावरण




धाराशिव (जिमाका) -महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ (जिल्हा बीड) येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ऐतिहासिक 'अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्स्पो, २०२६' या प्रदर्शनाच्या लोगोचे अनावरण आज धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याधरण कडवकर, जिल्हा नियोजन अधिकारी श्री.पुंडलिक गोडसे,जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ.धनंजय महाजन तसेच पशुधन विकास अधिकारी डॉ. वैभव पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

लोगो अनावरणानंतर संवाद साधताना जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार म्हणाले की,पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे.परळी वैजनाथ येथे होणारे हे महाप्रदर्शन देशातील जातीवंतू पशुधन व आधुनिक तंत्रज्ञानाचा संगम ठरणार आहे.

या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकरी व पशुपालकांना दुग्धव्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान एका छताखाली पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे.

प्रदर्शनाबाबत अधिक माहिती देताना जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) डॉ. धनंजय महाजन यांनी सांगितले की,या महा एक्स्पोमध्ये राज्यातील तसेच राज्याबाहेरील जातीवंत गायी,म्हशी,शेळ्या-मेंढ्या तसेच विविध पक्षी प्रजातींचे दर्शन घडणार आहे. यासोबतच आधुनिक डेअरी फार्मिंग,चारा व्यवस्थापन,प्रक्रिया उद्योगांचे भव्य स्टॉल्स,पशुधन आरोग्य,लसीकरण व वैज्ञानिक संगोपनावर तज्ज्ञ पशुवैद्यकांची विशेष व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

लोगो अनावरणानंतर संपूर्ण जिल्ह्यात या प्रदर्शनाची व्यापक प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून,सर्व पशुवैद्यकीय संस्था,पंचायत समित्या व सार्वजनिक ठिकाणी बॅनर-पोस्टर्सद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून घरपोच माहिती देण्याचेही नियोजन विभागाने केले आहे. त री जिल्ह्यातील सर्व पशुपालक,शेतकरी व उद्योजकांनी 'महा पशुधन एक्स्पो २०२६' मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## एस.टी. प्रवासाचा नवा डिजिटल युगारंभ; सवलतधारकांसाठी "NCMC" स्मार्ट कार्डची अनिवार्यता - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

मुंबई : (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या म्हणजेच एसटीच्या प्रवासात आता तंत्रज्ञानाची नवी पहाट उगवली आहे. रोख व्यवहारांच्या पलीकडे जाऊन, पारदर्शकता आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने एस.टी. महामंडळाने 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) प्रणाली लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.यापुढे विविध सामाजिक सवलतींचा लाभ घेण्यासाठी हे स्मार्ट कार्ड अनिवार्य असणार आहे.

सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही गोष्टी एका कार्डमध्ये सामावल्या जाणार आहेत.

या प्रकल्पासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि NSDL पेमेंट्स बॅंक यांच्याशी करार केला असून, लवकरच सर्व आगारांमध्ये नोंदणी मोहीम सुरू होणार आहे.

**कोणाला मिळणार NCMC कार्ड?**

या नव्या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे:

**विद्यार्थी:** शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी जोडलेले कार्ड दिले जाईल.

**ज्येष्ठ नागरिक व महिला:** अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना आधार संलग्न कार्ड मिळेल.

**दिव्यांग प्रवासी:** णऊख्रऊ क्रमांक जोडून विशेष सुविधा असलेले कार्ड.

**पुरस्कारार्थी व पत्रकार:** स्वातंत्र्यसैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालय येथील मुख्यालय आगारा मार्फत वितरण.

**कार्डची वैशिष्ट्ये - प्रवासात स्मार्ट सोय**

**१) किंमत:** नवीन कार्ड १९९ रुपये (GST सह). जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत उपलब्ध.

**२) वॉलेट मर्यादा:** किमान १०० रुपये; ५० रुपयांच्या पटीत रिचार्ज.

**३) रिचार्ज सुविधा:** ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल प किंवा नियुक्त एजंटकडून सहज रिचार्ज.

**४)नोंदणीसाठी व्यापक यंत्रणा:** ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी ३००० हून अधिक अधिकृत एजंट नियुक्त करण्यात आले आहेत.

५) बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पार पडणार असल्याने ग्रामीण भागातील प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार आहे.

एस.टी.चा हा निर्णय म्हणजे परंपरागत प्रवास व्यवस्थेला डिजिटल स्पर्श देणारा टप्पा आहे. तिकीट हातात आणि सुट्या पैशांची चिंता या जुन्या गोष्टी आता इतिहासजमा होत आहेत. नव्या युगात, एका स्मार्ट कार्डच्या स्पर्शाने प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक होणार आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले.

## स्मार्ट टेक, सुरक्षित पर्याय - सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम




धाराशिव, (जिमाका) जगभरात साजरा होणाऱ्या सुरक्षित इंटरनेट दिन २०२६ निमित्त धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन आज करण्यात आले.या कार्यक्रमात जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी श्री.अंकित सिंह यांनी इंटरनेटचा सुरक्षित व जबाबदार वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार व निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.


मार्गदर्शन करताना श्री.सिंह यांनी इंटरनेट म्हणजे काय,त्याचा उपयोग कोणकोणत्या बाबींमध्ये केला जातो,डिजिटल पेमेंटसाठी इंटरनेटचा वापर कसा होतो याची माहिती दिली. तसेच इंटरनेटचा अतिवापर केल्यास होणारे दुष्परिणाम व त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम याबाबतही त्यांनी उपस्थितांना जागरूक केले.

सायबर गुन्हेगारी,सायबर फसवणूक कशी घडते,अनोळखी लिंकवर क्लिक केल्याने होणारे धोके,मजबूत (डीपस) पासवर्ड कसा तयार करावा व तो सुरक्षित कसा ठेवावा,यासह कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) चा जबाबदारीने वापर कसा करावा, याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्क राहावे,असे आवाहन त्यांनी केले. युरोपीय नेटवर्क ऑफ इंटरनेट सेफ्टी सेंटर्स (खपीरषश छर्शीीज्ञ) यांच्या पुढाकाराने दरवर्षी सुरक्षित इंटरनेट दिन साजरा केला जातो.स्मार्ट टेक,सुरक्षित पर्याय - आजचा सुरक्षित आणि जबाबदार वापर या संकल्पनेवर आधारित या दिनाचा उद्देश इंटरनेट सुरक्षितता,डिजिटल साक्षरता व सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणे हा आहे.सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त प्रत्येक नागरिकाने डिजिटल व्यवहार करताना दक्ष राहून वैयक्तिक माहितीचे संरक्षण करावे व इंटरनेटचा सुज्ञ,सुरक्षित आणि जबाबदार वापर करावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखेचे अधिकारी - कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात,जिल्हा परिषदेच्या विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी हे जिल्हा परिषद सभागृहातून तर विविध विभागाचे अधिकारी -कर्मचारी ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.

## पहिल्याच धडाक्यात नगरपरिषदेची सभा; कार्यकाळ सुधारित!

# धाराशिव शहरातील रखडलेल्या प्रश्नांवर अखेर हालचाल झाली ती 'लातूर समाचारच्या' वृत्तामुळे!




**धाराशिव (रामेश्वर डोंगरे)** -पहिल्याच बातमीचा जबरदस्त इम्पॅक्ट पडत नगरपालिकेची सर्वसाधारण सभा तातडीने बोलावण्यात आली आणि सभेचा कार्यकाळही सुधारित करण्यात आल्याचे दिसून आले. शहरातील स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती, नाल्यांची दुर्दशा, कचऱ्याचे ढिगारे, रखडलेली विकासकामे अशा अनेक प्रश्नांवर सत्ताधाऱ्यांनी घेतलेली शांत भूमिका नागरिकांच्या रोषाला कारणीभूत ठरली होती. मात्र लातूर समाचारने हा प्रश्न थेट जनतेसमोर आणताच सत्ताधाऱ्यांना जाग आल्याचे दिसून आले.

सभेत चर्चेसाठी महत्त्वाचे मुद्दे म्हणजे शहरातील भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी उपाययोजना व निविदा प्रस्ताव, कायदेविषयक सल्लागारांची नेमणूक, सुधारित आकृतीबंध प्रस्ताव शासनाकडे पाठविणे, रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत प्रस्ताव, वारस हक्काने सेवेत नियुक्तीबाबत निर्णय, नगरपरिषदेच्या पॅनेलवर सल्लागार अभियंता नेमणूक, पोलीस लाईन परिसरात उद्यान निर्मिती व तांत्रिक सल्लागार नेमणूक, जिल्हा वार्षिक योजना २०२४-२५ व २०२५-२६ अंतर्गत प्रस्ताव, थकीत मालमत्ता कर वसुली व दंड माफी योजना, माजी सैनिक व त्यांच्या विधवांना मालमत्ता कर सवलत, एलईडी पथदिवे देखभाल व नवीन दिवे बसविणे,

घनकचरा व्यवस्थापन व कचरा डेपो स्थलांतर करणे,

जनतेच्या प्रश्नांवर आता ठोस निर्णय घ्या!

शहरवासीयांमध्ये वाढत चाललेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर ही सभा घेणे सत्ताधाऱ्यांना भाग पडले. दैनिक लातूर समाचारने केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हा निर्णय झाल्याची चर्चा सर्वत्र रंगली आहे. पहिल्या बातमीनेच सत्ताधाऱ्यांची झोप उडाली आणि 'सभेचा विसर' पडलेल्या नगरपरिषदेने तातडीने कार्यवाही करत सभा जाहीर केली. त्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फुटण्यास मदत झाली आहे.

पत्रकारितेची ताकद पुन्हा सिद्ध!

सत्य शोधून लिहिण्याची ताकद असलेल्या दैनिक लातूर समाचारने पुन्हा एकदा आपली जबाबदारी पार पाडत शहराच्या प्रश्नांवर उत्तर देण्यास भाग पाडले आहे.

आता शहरवासीयांची एकच अपेक्षा -

केवळ सभा नव्हे, तर ठोस अंमलबजावणी व्हावी!

धाराशिवकरांच्या नजरा आता सभेकडे लागल्या असून, घेतलेले निर्णय प्रत्यक्षात कितपत उतरतात याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. धन्यवाद दिले आहेत.

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ १३ फेब्रुवारी रोजी शेतकऱ्यांसाठी वेबिनार

धाराशिव,दि.११ फेब्रुवारी (जिमाका) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन मिळावे, यासाठी प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई स्तरावरून दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रकल्पाच्या टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक व सामुदायिक लाभाचे विविध घटक समाविष्ट करण्यात आले आहेत.वैयक्तिक लाभामध्ये वृक्ष लागवड,बांबू लागवड,फळबाग लागवड,ठिबक सिंचन संच,तुषार सिंचन,शेततळे,शेततळे अस्तरीकरण,शेडनेटगृह व हरितगृहामधील लागवड साहित्य, गांडूळ खत व पुनर्भरण,पाईप व पंप संच (अनुसूचित जाती व जमातीतील लाभार्थ्यांसाठी), बीजोत्पादन,रेशीम उद्योग,गोड्या पाण्यातील मत्स्यपालन,शेळीपालन तसेच भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परित्यक्ता व घटस्फोटीत महिलांसाठी विशेष लाभांचा समावेश आहे.

सामुदायिक लाभांतर्गत एफपीओ, एफपीसी व एफएसजी यांच्यासाठी ६० टक्के अनुदानावर गोडाऊन उभारणीची सुविधा देण्यात येणार आहे.तसेच उमेद,महिला व आर्थिक विकास महामंडळ पुरस्कृत महिला बचत गट व गावसंघ तसेच एमएसआरएलएम यांच्यासाठी ६० टक्के अनुदानावर औजारे बॅंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या वेबिनारच्या माध्यमातून शेतकऱ्यांना नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २ अंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध योजनांची माहिती व ऑनलाईन अर्ज प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन मिळणार आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## घातक बाबी नकोच...

जगण्यासाठी सर्वांना महत्त्वाचे अन्न लागते. जे जीवप्राणी आहेत त्यांना अन्नाची आवश्यकता भासते. गेल्या काही दशकांमध्ये महाराष्ट्रात कीटकनाशकांचा वापर तिपटीहून अधिक वाढला आहे. २००७-०८ मध्ये राज्यात ३ हजार ५० टन रासायनिक कीटकनाशके उपयोगात आली होती. २०२२-२३ मध्ये हा वापर तब्बल १५ हजार ४६५ मेट्रिक टनांपर्यंत पोहोचला. रासायनिक कीटकनाशकांच्या वापरात वाढ ही तणनाशके, पीकसंवर्धक, बुरशीनाशके आणि आंतरप्रवाही कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे झाल्याचा निष्कर्ष नोंदविण्यात आला आहे. अनेक राज्यांमध्ये रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होत चाललेला असताना महाराष्ट्रात मात्र तो वाढत चालल्याचे विपरीत चित्र आहे. राज्यात प्रतिहेक्टर ३.९६ किलोग्रॅम प्रतिहेक्टर कीटकनाशके फवारली जातात. राज्यात जैविक कीटकनाशकांचा वापर कमी असून कृषी आयुक्तालयाच्या अहवालानुसार २०२४-२५ या वर्षात एकूण १५९६६ मे.टन जैविक कीटकनाशकांचा वापर झाला. गेल्या काही वर्षांत मजुरांची कमी उपलब्धता आणि वाढलेली मजुरी यामुळे तणाचा नायनाट करण्यासाठी खुरपणीऐवजी फवारणी यंत्राला अधिक पसंती मिळाली आहे. यातून तण नाहीसे होत असल्याचे समाधान शेतकऱ्यांना मिळत असले, तरी अतिरेकी वापरातून जमिनीस पोषक सूक्ष्म जीवाणूंसाठी ते घातक ठरू लागले आहेत. कीटकनाशक वापरातील निष्काळजीपणातून सुपीकतेवर दूरगामी परिणाम होण्याची भीती मृदतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. कापूस पिकावर गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. नियंत्रणासाठी कीटकनाशकांचा वापर अपरिहार्य ठरतो. सुमारे आठ वर्षांपूर्वी कीटकनाशक फवारणीतून विषबाधा होऊन राज्यात शंभरावर शेतकरी, शेतमजुरांचा मृत्यू झाल्यानंतर खडबडून जागे झालेल्या सरकारने उपाययोजना हाती घेतल्या, पण अजूनही पुरेशा प्रमाणात जागरूकता आलेली नाही. 'पॅन इंडिया' या संस्थेच्या सर्वेक्षणात, कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देण्यात आली आहे. २०२२-२५ दरम्यान यवतमाळ जिल्ह्यातील ४५ गावांमध्ये १ हजार ४८५ शेतकऱ्यांचे सर्वेक्षण झाले. निम्मे शेतकरी १० वर्षांपासून सातत्याने या रसायनांच्या संपर्कात आहेत. कीटकनाशकांची साठवणूक करण्याची पद्धत धोकादायक असल्याचे सर्वेक्षणातून स्पष्ट झाले आहे. यातून आजारपण वाढले, खर्च वाढले. त्यामुळे सरकारने रासायनिक औषधी बंद करून जैविक कीटकनाशकांचा वापर वाढविण्यावर भर द्यावा, असे मत या अहवालात मांडण्यात आले आहे. 'कीटकनाशके कायदा-१९६८' अस्तित्वात आहे. हा कायदा होण्यापूर्वी जी कीटकनाशके वापरली जात होती, त्यांच्या नोंदणीची गरज नाही, असे मानले गेले. त्या वेळी फारच कमी कीटकनाशकांचा वापर होत होता, परंतु १९६८ चा कायदा झाल्यावर देशात वापरात असलेल्या सर्व कीटकनाशकांची नोंदणी बंधनकारक असताना काही कीटकनाशकांचा आजही नोंदणीशिवाय वापर होताना दिसतो. केंद्र सरकारने गेल्या महिन्यात कीटकनाशक व्यवस्थापन विधेयकाचा एक मसुदा जारी केला. हे विधेयक कीटकनाशक कायदा, १९६८ आणि त्याअंतर्गतच्या कीटकनाशक नियम, १९७१ ची जागा घेणार आहे. तंत्रज्ञान आणि डिजिटल पद्धतींचा वापर करून बनावट, भेसळयुक्त कीटकनाशकांची विक्री रोखणे हा यामागील उद्देश आहे. त्यासाठी जास्त दंडात्मक तरतुदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. रासायनिक कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे शेतमालाच्या असुरक्षिततेचा प्रश्न तयार झाला असून पर्यावरणावरदेखील परिणाम जाणवू लागले आहेत. कीटकनाशकांचा वापर अनियंत्रित झाल्यास त्याठिकाणी समस्या निर्माण होतात. कीटकनाशकांच्या अशास्त्रीय वापरामुळे कीटकांत प्रतिकारशक्ती विकसित होत आहे. कीटकनाशक कंपन्यांकडून उत्पादनाबरोबरच माहितीपत्रकही दिले जाते, परंतु त्यावरील अक्षरांचा आकार कमी असतो. परिणामी, धोकादायक कीटकनाशके कशी हाताळावीत, शरीरावर विषाचा परिणाम झाल्यास उपाय काय, अशा अनेक प्रकारच्या समस्या प्रभावीपणे लक्षात येत नाहीत. अनेक शेतकरी शिफारशीविना म्हणजे केवळ कृषी सेवा केंद्र चालकाच्या सल्ल्यावरून कीटकनाशके फवारतात. यातूनच फवारणीदरम्यान विषबाधेची आणि पर्यावरणीय दुष्परिणामांची जोखीम वाढते. त्यावर नियंत्रणासाठी स्थानिक प्राधिकरणाच्या माध्यमातून स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची गरज व्यक्त होत आहे. रायायनिक पदार्थाचा वापराचा परिणाम हा निसर्गावर होत आहे. शेतीमध्ये सकाळच्या वेळी अनेक पक्षी पिकावर खाण्यासाठी येतात, फळ शेती असेल तर फळे खाण्यासाठी अनेक पक्षाचे थवेच्या थवे येतात. शेतकरी सुद्धा पक्षाने खाऊन जे राहीले ते आपले म्हणत असत, अशी मोठी मानसिकता पुर्वी होती. आता पक्षाला हाकालणे, त्यापेक्षाही फळावर व धान्यावर घातक फवारणी केली जाते यामुळे पशुपक्षाची मृत्यू होतो असे भयानक चित्र पाहावयास मिळते. त्यामुळे किटकनाशक, तणनाशकाचा परिणाम हा घातक होताना दिसून येत आहे. जैविक शेती ही सर्वात योग्य आहे. याकडे वळावेच लागणार आहे. नसता मानवास दुर्धर जे कर्करोगासारखे रोग होतील. ती दुरूस्तीसाठी हजारोंचा नाही तर लाखोंचा खर्च करावा लागणार आहे. दुषीत अन्नाचा परिणाम हा मोठा भोगावा लागत आहे. मुळात वरचेवर फवारणी जी घातक ठरणारी आहे यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. युरीयाचा वापर वाढला आहे. जेथे ऊसाचे उत्पादन अधिक होते त्या ठिकाणीतर युरीया खताचा अधिक वापर होताना दिसून येत आहे. तो जमीनीत मिसळल्यावर विंधन विहीरी व विहीरीचे पाणी दुषीत होण्याची भिती असते. त्यामुळे घातक रासायनिक पदार्थाचा वापर टाळला पाहिजे. घातक औषधे जे फवारणी करताना विचार केला पाहिजे. नसता आपोआत प्राणी मात्र व्यक्ती व पशुचे जीवन समाप्त होतील. घातक असे रासायनिक फवारणीचा वापर टाळावा लागेल. जे घातक व विनाशक आहे ते वापरणे टाळावे लागणार आहे. ज्या बाबी घातक ठरणाऱ्या आहेत. त्याचा परिणाम हा वाईट आहे त्याचा वापर टाळणे आवश्यक या बाबत सरकारपक्षाने सुद्धा गांर्भीयाने विचार केला पाहिजे. शेतकरी नागरिकांनी यापुढे रासायनिक वापर कमी करावा व जीवन आनंदी बनवावे.

## दयानंद कला महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** सोमवार दि. ९/२/२०२६ रोजी दयानंद कला महाविद्यालयात सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अनमोल मार्गदर्शनानुसार उद्घाटन उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी, राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ सल्लागार, राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त श्री.भरत पवार यांच्या हस्ते सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध नृत्यांगना, लावण्यवती,लोक कलावंत कु. अपर्णा पवार यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे संचालक प्रा.डॉ. संतोष पाटील उपस्थित होते. तसेच सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे ,सहसमन्वयक स्फूर्ती समुद्रे, प्रा.अश्विनी धायगुडे आणि मंडळाचे सर्व पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ही मान्यवरांच्या हस्ते सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या बोधचिन्हाच्या अनावरणाने झाली. तसेच मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने त्रिमुख इगवे व स्वाती जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांनी सामाजिक शास्त्रे म्हणजे काय ते सांगून मंडळाची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली तसेच या अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे सामाजिक समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा व्यापक झाला आहे हेही स्पष्ट केले. उद्घाटन समारंभा प्रसंगी श्री. भरत पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले दयानंद कला महाविद्यालय आणि सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या मुळेच मला एक नवी ओळख प्राप्त झाली आहे. जीवनाला दिशा आणि आकार देणारे हे महाविद्यालय आहे.

त्याचबरोबर त्यांनी स्पर्धा परीक्षेसाठी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोरड्या आणि वरवरच्या प्रयत्न - वादा पेक्षा सायास आणि यश प्राप्तीसाठीची धडपड महत्त्वाची आहे.त्यानंतर भारतीय संस्कृती व लोककलेचा वारसा जपणाऱ्या लोक कलावंत लावणी सुप्रसिद्ध नृत्यांगना अपर्णा पवार यांनी कला आणि जीवन याबद्दल विद्यार्थ्यांना संबोधित केले. एका कलाकारासाठी कला हेच जीवन असते. प्रत्येक कलाकाराने आपली कला जपावी व जगावी असे त्या म्हणाल्या. त्यानंतर सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे अध्यक्ष वसंत कुलकर्णी यांनी मंडळाचे नूतन पदाधिकारी व सदस्य यांचे अभिनंदन केले. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळ हे व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक जाणीवेला प्राधान्य देणारे व्यासपीठ आहे असे ते म्हणाले. मंडळाच्या पुढील कार्यक्रमाची ही रुपरेषा त्यांनी मांडली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ.संतोष पाटील यांनी केला त्यावेळी त्यांनी सर्व पदाधिकाऱ्यांचे त्यांच्या कार्याचे व बोधचिन्हासारख्या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे कौतुक व अभिनंदन केले. संकल्पनेसाठी प्रा. डॉ.संतोष पाटील यांनी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे सचिव त्रिमुख इगवे यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले. तसेच विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीवेबद्दल व या स्पर्धेच्या युगातील वास्तविकते विषयी सांगून मोलाचे मार्गदर्शन केले. मंडळाच्या उपाध्यक्षा कामाक्षा मुदाळे यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन नेहा मोरे व निलेश वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, प्रा. चैतन्य शिंदे व प्रा. अश्विनी धायगुडे यांचे याप्रसंगी महत्वपूर्ण सहकार्य लाभले.अध्यक्ष वसंत कुलकर्णी, उपाध्यक्ष कामाक्षा मुदाळे, सचिव त्रिमुख इगवे, कोषाध्यक्ष विमल पाल संपादक देवांश पाचंगे, प्रसार माध्यमे प्रमुख विशाल भांगुरे, कलामंच प्रमुख निलेश वाघमारे, तसेच सदस्य सोनिया कांबळे ,स्वाती जाधव,अमृता काळे, अश्विनी चव्हाण, शुभम जानापुरे ,अभिषेक ठाकूर इ. निवड करण्यात आली. सर्व पदाधिकारी व सदस्य यांची अधिकृतपणे घोषणा झाली. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

## देवस्थान समिती व शासकीय यत्रंणांच्या समन्वयातून यात्रा महोत्सव यशस्वी करावा : अतिरिक्त जिल्हाधिकारी केशन नेटके



सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सव पूर्व तयारी आढावा बैठक

**लातूर/प्रतिनिधी :**लातूरचे ग्रमदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने यावर्षी १५ फेब्रुवारी ते २ मार्च या दरम्यान महाशिवरात्री यात्रा महोत्सव पार पडत आहे. या यात्रा महोत्सवाच्या माध्यमातून लातूरची गौरवशाली परंपरा अधिकाधिक उज्ज्वल करत यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी देवस्थान समितीच्या सहकार्यातून सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क रहावे, अशी सूचना अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांनी दिली आहे.

लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर महाशिवरात्री यात्रा महोत्सवाची पूर्व तयारी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठक अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी देवस्थानचे प्रशासक सचिन जांबूतकर, ज्येष्ठ विश्वस्त तथा माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे, अशोक भोसले, नरेश पंड्या, रमेशसिंह बिसेन, व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने आयोजित होत असलेली महाशिवरात्री यात्रा महोत्सव हे लातूरचे वैभव आहे. या यात्रेची महती लातूर जिल्ह्यासह परजिल्ह्यात व इतर राज्यातही पोहोचली आहे. यामुळे या यात्रा महोत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक व नागरिकांची मोठी गर्दी होते. ही गर्दी लक्षात घेवून प्रशासकीय यंत्रणांनी योग्य ते नियोजन करावे, असे सांगून अतिरिक्त जिल्हाधिकारी केशव नेटके म्हणाले की, वाहतूक, पार्कींग व सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून शहर महानगरपालिका व पोलिस प्रशासनाने तात्काळ आवश्यक त्या उपाय योजना सुरु कराव्यात असे सांगितले. मंदीर परिसरात स्वतंत्र पोलिस कक्ष स्थापन करून त्या ठिकाणी ध्वनीनिक्षेपक व धोक्याची सूचना देणारी यंत्रणा सज्ज करावी. गर्दीचे योग्य नियोजन करण्यासाठी रांग व्यवस्था योग्य प्रकारे करून या ठिकाणी देवस्थानच्या वतीने स्वयंसेवक नेमावे अशी सूचना करण्यात आली.

महापालिका प्रशासनाने मंदीराकडे जाणाया सर्व प्रमुख मार्गाची तत्काळ दुरुस्ती करून सुरक्षेच्या दृष्टीने पथदिवे तातडीने सुरु करावेत, अशी सूचना करून यात्रा महोत्सव परिसरात आरोग्य यंत्रणा व रुग्णवाहिका सज्ज ठेवावी, असे केशव नेटके यांनी सांगितले. यात्रा महोत्सवादरम्यान परिसरात स्वच्छता ठेवण्यासाठी मनपा प्रशासनाने विशेष लक्ष देवून याठिकाणी स्वच्छता पथक तैंनात करण्याची सूचनाही देण्यात आली. यात्रा महोत्सवात जे खाद्य पदार्थाचे स्टॉल उभारले जातात त्या ठिकाणी कोणतीही भेसळ होणार नाही याची दक्षता घेवून तेथील खाद्य पदार्थाचे नमुने वेळोवेळी घेवून अन्न औषध प्रशासनाने त्याची तपासणी करावे, असेही सूचना करण्यात आले. कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या वतीने करण्यात येणाया प्रदर्शाची अधिकाधिक प्रसिध्दी करून या माध्यमातून शेतकयांमध्ये जनजागृती करण्यात यावी, अशी सूचना यावेळी करण्यात आली.

देवस्थानच्या वतीने ज्येष्ठ विश्वस्त विक्रम गोजमगुंडे यांनी काही अडचणी मांडल्या. त्या अडचणी सोडविण्यासाठी तात्काळ उपाय योजना करण्यात यावे, असे निर्देश अतिरिक्त जिल्हाधिकारी नेटके यानी दिले. यावेळी देवस्थानच्या वतीने यात्रेच्या पहिल्या दिवशी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते होणारे ध्वजारोहन व महाभिषेक यासाठी निमंत्रित करण्यातआले आहे. यावेळी पोलिस, आरोग्य, महानगरपालिका, जिल्हा परीषद, बांधकाम विभाग, महावितरण, अन्न व औषध प्रशासन आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## लातूर जिल्हा पोलीस दलातील ४६ पदांसाठी भरती प्रक्रियेस प्रारंभ

### पहिल्याच दिवशी २१३ उमेदवारांची उपस्थिती* पारदर्शक, सुयोजित व काटेकोर नियोजनात मैदानी चाचणी





**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई ३० व चालक पोलीस शिपाई १६ अशा एकूण ४६ रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेस आज दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, लातूर येथे मैदानी चाचणीद्वारे अधिकृतपणे प्रारंभ करण्यात आला. सदर भरती प्रक्रिया दिनांक २३/०२/२०२६ पर्यंत नियोजित असून या कालावधीत सर्व पात्र उमेदवारांची शारीरिक व मैदानी चाचणी काटेकोरपणे पार पाडली जाणार आहे.

भरती प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी सकाळी लवकर मैदानी परीक्षेस सुरुवात करण्यात आली. एकूण २१३ उमेदवार उपस्थित राहून त्यांनी विविध शारीरिक चाचण्यांमध्ये सहभाग नोंदविला. उमेदवारांची शारीरिक क्षमता, व इतर आवश्यक निकषांच्या आधारे अचूक मोजमाप पद्धतीने तपासणी करण्यात आली. प्रत्येक इव्हेंटमध्ये पारदर्शकता राखण्यासाठी आवश्यक तांत्रिक साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

भरती प्रक्रियेसाठी येणाऱ्या उमेदवारांच्या सोयीसुविधांचा विशेष विचार करून पोलीस प्रशासनाकडून सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या उमेदवारांसाठी पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी मंडप उभारणी, विश्रांतीसाठी स्वतंत्र जागा तसेच तत्काळ वैद्यकीय मदतीसाठी वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळावेत यासाठी रुग्णवाहिकेचीही व्यवस्था ठेवण्यात आली आहे. लांबवरून येणाऱ्या उमेदवारांना रात्रीच्या वेळी रस्त्यावर किंवा उघड्यावर थांबावे लागू नये, यासाठी पोलीस मुख्यालयातील नटराज रंगमंदिर येथे निवासाची तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. त्याठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रकाशव्यवस्था तसेच तात्पुरत्या स्वरूपातील स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उमेदवारांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस बंदोबस्तही ठेवण्यात आला आहे. सदर भरती प्रक्रिया मा. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे तसेच मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या थेट देखरेखीखाली अत्यंत पारदर्शकपणे व निष्पक्षतेने पार पाडली जात आहे. प्रत्येक इव्हेंटचे व्हिडिओ रेकॉर्डिंग व छायाचित्रण करण्यात येत असून प्रत्येक उमेदवाराची कामगिरी नोंदवहीत अचूकरीत्या नोंदवली जात आहे. मा. पोलीस अधीक्षक स्वतः पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येते की, सदरची भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, गुणवत्ताधारित व नियमबद्ध पद्धतीने राबविण्यात येत आहे. कोणत्याही व्यक्तीच्या भूलथापांना बळी पडू नये किंवा कोणासोबतही कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार करू नये. भरती प्रक्रियेत कोणतीही शिफारस, मध्यस्थी किंवा गैरमार्ग अवलंबिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी कोणत्याही प्रकारची उत्तेजक औषधे, कामगिरी वाढविणारी प्रतिबंधित औषधे किंवा इतर अनधिकृत मार्गांचा अवलंब करू नये. असे आढळून आल्यास संबंधित उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्यांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

लातूर जिल्हा पोलीस दला कडून ही भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात येत असून पात्र व गुणवत्ताधारक उमेदवारांना संधी देण्याचा पोलीस प्रशासनाचा ठाम निर्धार आहे.

## चिकन, मटन आणि मासे किती दिवस रेफ्रिजरेटरमध्ये फ्रेश राहातात?

आरोग्यासाठी अन्न हे अत्यंत महत्त्वाचे आहे. अन्नाची स्वच्छता आणि हायजिन याबाबत खबरदारी घेणे आवश्यक आहे. अन्यथा, आजार होण्याचा धोका जास्त असतो. घरी शिजवलेले अन्न आरोग्यदायी असते. बरेच लोक त्यांच्या घरात रेफ्रिजरेटर वापरतात. विविध प्रकारचे अन्न साठवण्यासाठी रेफ्रिजरेटरचा वापर केला जातो. फळे, भाज्या, लोणचे आणि शिजवलेल्या भाज्या या रेफ्रिजरेटरमध्ये साठवल्या जातात. परंतु प्रत्येक गोष्टींची एक शेल्फ लाइफ असते. जर शेल्फ लाइफ पेक्षा जास्त काळ कोणतीही गोष्ट साठवून ठेवली तर ती खराब होते. असंच चिकन, मटण आणि माशांबाबत देखील आहे. त्यांच्या साठवणुकीची देखील एक शेल्फ लाइफ असते. चिकन किंवा मटण जास्त काळ साठवल्याने त्यांची चव आणि पौष्टिकतेवर परिणाम होतो. चिकन आणि मटण सारखे मांस रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्यानंतर किती काळ ताजे राहते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. आता, ते किती काळ टिकते ते पाहूया...

चिकन किती काळ ताजे राहते? जर तुम्हाला कच्चे चिकन रेफ्रिजरेटरमध्ये ठेवायचे असेल तर फक्त एक किंवा दोन दिवस ठेवा आणि नंतर स्वयंपाकासाठी वापरा. जर चिकन घट्ट बंद डब्यात ठेवले तर ते फ्रीजरमध्ये आठवडाभर ठेवता येते. चिकनमध्ये जास्त आर्द्रता असते, म्हणूनच रेफ्रिजरेटरचे तापमान त्याच्या ऊतींना तोडते, ज्यामुळे ते लवकर खराब होते. जर चिकनचा विचित्र वास येत असेल किंवा किंचित तपकिरी दिसत असेल तर ते खराब होण्याची शक्यता असते. कधीकधी, खराब झालेले चिकन पातळ होऊ शकते. म्हणून, ते एक किंवा दोन दिवसांपेक्षा जास्त काळ साठवू नये.

मटण किती काळ ताजे राहते? हेल्थलाइनच्या मते, मटण रेफ्रिजरेटरमध्ये तीन ते पाच दिवस साठवता येते. परंतु, मटणातील चरबी लवकर वास शोषून घेते. हे टाळण्यासाठी, ते गळती-प्रतिरोधक पॅकेजिंगमध्ये साठवले पाहिजे. जर तुमच्या घरी भरपूर मटण असेल तर तुम्ही ते सहजपणे सील करून फ्रिजरेटरमध्ये ठेवू शकता. जेव्हा मटण खराब होते तेव्हा वास येऊ लागतो आणि ते बारीक होते. त्याचा रंग देखील बदलतो. तज्ञांच्या मते, असे मटण खाणे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक आहे.

मासे किती काळ ताजे राहतात? तापमानातील बदलांना मासे लवकर प्रतिक्रिया देतात. रेफ्रिजरेटरमध्ये ठेवलेले मासे देखील त्यांचा ताजेपणा गमावू शकतात. म्हणून, मासे खरेदी केल्यानंतर लगेच शिजवणे चांगले. जर तुम्हाला ते रेफ्रिजरेटरमध्ये ठेवायचे असेल तर तुम्ही ते बर्फाच्या तुकड्यांनी भरलेल्या भांड्यात ठेवू शकता. जेव्हा मासे खराब होतात तेव्हा त्यांचा उग्र वास येऊ लागतो.

शिजवलेले अन्न किती काळ साठवावे? बरेच लोक चिकन किंवा मटण शिजवल्यानंतर ते साठवून ठेवतात. परंतु, शिजवलेले चिकन ३ ते ४ दिवसांपेक्षा जास्त काळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नये. तज्ञांचं म्हणणं आहे की शिजवलेले मटण देखील ३ ते ४ दिवसांपेक्षा जास्त काळ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नये. यापेक्षा जास्त काळ साठवल्याने समस्या निर्माण होऊ शकतात.

कोणत्या गोष्टी ओळखल्या पाहिजेत?

चिकन किंवा मटण फ्रीजमध्ये ठेवण्यापूर्वी ते चांगले धुवा आणि त्यातील रक्त काढून टाका.

चिकन किंवा मटण रेफ्रिजरेटरमध्ये ठेवण्यापूर्वी ते पूर्णपणे कोरडे आणि हवाबंद डब्यात ठेवा.

मांस नेहमी फ्रीजरमध्ये कमी तापमानावर ठेवा. तापमान जितके कमी असेल तितके ते चांगले राहील.

## होळी पाकिस्तानातही साजरी केली जाते का? सर्वात मोठ्या प्रमाणात हा सण कुठे साजरा केला जातो?

पाकिस्तानमधील सर्वात मोठा होळी उत्सव कराचीमध्ये होतो. ऐतिहासिक श्री स्वामीनारायण हिंदू मंदिर हे या उत्सवांचे केंद्र आहे. दरवर्षी शेकडो भाविक तेथे जमतात. उत्सवाची सुरुवात होलिकेच्या दहनाने होते, त्यानंतर रंग खेळणे, भक्तीगीते, नृत्य आणि सामुदायिक मेजवानी होतात. कराचीची होळी अद्वितीय आहे कारण शहराच्या विविध भागातील लोक त्यात सहभागी होतात.

होळी पाकिस्तानातही साजरी केली जाते का? सर्वात मोठ्या प्रमाणात हा सण कुठे साजरा केला जातो?

भारतात होळी हा रंगांचा सण म्हणून ओळखला जातो. हा सण आनंद, नवीन सुरुवात आणि वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. सीमेपलीकडे पाकिस्तानमध्येही हा सण दरवर्षी हिंदू समुदाय साजरा करतो. चला जाणून घेऊया पाकिस्तानमध्ये कुठे होळी सर्वात जास्त धूमधडाक्यात साजरी केली जाते.

**पाकिस्तानमध्ये होळी साजरी**

पाकिस्तानातही होळी साजरी केली जाते, विशेषतः सिंधमध्ये. हा सण साधारणपणे मार्चच्या सुरुवातीला येतो. या वर्षी, होळी ४ मार्च रोजी साजरी केली जाते. अल्पसंख्याकांचा सण असूनही, होळी उत्साहाने, पारंपारिक रीतिरिवाजांनी आणि मोठ्या प्रमाणात समुदायाच्या सहभागाने साजरी केली जाते. शिवाय, सुरक्षा आणि सुव्यवस्थेसाठी स्थानिक अधिकाऱ्यांना देखील पाठिंबा आहे.

**कराचीमध्ये सर्वात मोठा होळी उत्सव होतो**

पाकिस्तानमधील सर्वात मोठा होळी उत्सव कराचीमध्ये होतो. ऐतिहासिक श्री स्वामीनारायण हिंदू मंदिर हे या उत्सवांचे केंद्र आहे. दरवर्षी शेकडो भाविक तेथे जमतात. उत्सवाची सुरुवात होलिकेच्या दहनाने होते, त्यानंतर रंग खेळणे, भक्तीगीते, नृत्य आणि सामुदायिक मेजवानी होतात. कराचीची होळी अद्वितीय आहे कारण शहराच्या विविध भागातील लोक त्यात सहभागी होतात.

**सांप्रदायिक सौहार्दाचे प्रतीक**

सिंधमधील मिठी शहराला अनेकदा हिंदू-मुस्लिम ऐक्याचे आदर्श म्हणून उद्धृत केले जाते. येथे हिंदू बहुसंख्य आहेत आणि ते केवळ धार्मिक कार्यक्रम म्हणून नव्हे तर सांस्कृतिक उत्सव म्हणून होळी साजरी करतात. मुस्लिम रहिवासी सक्रियपणे सहभागी होतात आणि भांडी फोडण्यासारख्या पारंपारिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात.

**मुलतान आणि होळीची प्राचीन मुळे**

मुल्तानमध्ये होळीला खोल ऐतिहासिक महत्त्व आहे. परंपरेनुसार या सणाची सुरुवात प्राचीन मुलतानमधील प्रल्हाद पुरी मंदिरात झाली. आख्यायिका या स्थळाला प्रल्हाद आणि भगवान विष्णूच्या नरसिंह अवताराच्या कथेशी जोडते. जरी हे मंदिर आज भग्नावस्थेत असले तरी, होळीशी त्याचा संबंध या प्रदेशाच्या प्राचीन वारशाचा भाग म्हणून लक्षात ठेवला जातो.

**इतर शहरांमध्ये होळी साजरी**

कराची, मिठी आणि मुलतान व्यतिरिक्त, लाहोर, रावळपिंडी आणि बलुचिस्तानच्या हिंदू बहुल भागातही होळी साजरी केली जाते. जरी त्याचे प्रमाण खूपच लहान असले तरी, गुलाल (रंगीत पावडर) लावणे, गाणे, नृत्य करणे आणि मिठाई वाटणे यासारखे विधी या उत्सवाचा एक प्रमुख भाग आहेत.

# मेंदूचे आजार व त्यांचे आजार

हे अत्यंत गंभीर असू शकतात, ज्यात ट्यूमर, स्ट्रोक, अल्झायमर, आणि एपिलेप्सी (फेफरे) यांचा समावेश होतो. सामान्य लक्षणांमध्ये तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, विसरभोळेपणा, बोलण्यात अडथळा, अर्धांगवायू (लकवा), आणि वागण्यात बदल होणे यांचा समावेश होतो, जे वेळेवर निदानासाठी महत्त्वाचे आहेत

**प्रमुख मेंदूचे आजार आणि लक्षणे:**

**ब्रेन ट्यूमर**: सतत डोकेदुखी, मळमळ, उलट्या, दृष्टी कमी होणे, आणि शरीराचा तोल जाणे २, ३.

**मेंदूचा पक्षाघात / स्ट्रोक**: अचानक चेहरा एका बाजूला वाकणे, हात कमकुवत होणे, बोलताना अडखळणे, आणि तीव्र डोकेदुखी

**अल्झायमर / स्मृतिभ्रंश** (-श्रृहशळाशीं/ ऊशाशपींळर): गोष्टी विसरणे, गोंधळलेली अवस्था, नवीन गोष्टी शिकण्यास अडचण, आणि व्यक्तिमत्त्वात बदल ५.

**एपिलेप्सी / फेफरे**: शरीराला झटके येणे, शुद्ध हरपणे, डोळ्यांसमोर अंधारी येणे, आणि विचित्र वर्तन करणे २, ४.

**मेंदुज्वर** (चशपळपसळींळी): ताप, मान कडक होणे, तीव्र डोकेदुखी, आणि प्रकाशाचा त्रास होणे क्शरश्रींहवळीशलीं १.

पार्किन्सन आजार (झरीज्ञळपीप'ी ऊळी-शरीश): हात-पाय थरथरणे, हालचाल संथ होणे, आणि शरीराचा समतोल बिघडणे २.

इतर सामान्य लक्षणे:


जास्त वेळ गोंधळलेले राहणे ५.

बोलण्यात किंवा समजण्यात अडचण ५.

अचानक किंवा हळूहळू दृष्टी कमी होणे

**टीप: वरीलपैकी कोणतीही लक्षणे जाणवल्यास त्वरित न्यूरोलॉजिस्टचा सल्ला घेणे आवश्यक आहे.**

**मेंदूच्या आजारांवर उपाय आणि प्रतिबंधात्मक टिप्स:**



पौष्टिक आहार (डीरळप ऊळशीं): आहारात अँटिऑक्सिडंट्स, ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्, फळे आणि पालेभाज्यांचा समावेश करा. बीटसारखे पदार्थ मेंदूला रक्तपुरवठा वाढवतात.


नियमित व्यायाम: दररोज ३० मिनिटे चालणे, योगासने आणि व्यायाम करा, ज्यामुळे मेंदूला रक्तपुरवठा वाढतो आणि मानसिक आरोग्य सुधारते.

पुरेशी झोप: रोज ७-८ तासांची चांगली झोप घेणे मेंदूच्या पुनरुज्जीवनासाठी आवश्यक आहे. मानसिक क्रिया: कोडी (ीुंश्रशी), बुद्धिबळ वाचन किंवा नवीन भाषा शिकल्याने मेंदू सक्रिय राहतो. ताण-तणाव व्यवस्थापन: ध्यान, योगासने आणि सामाजिक क्रियाकलापांत सक्रिय राहून ताण कमी करा.

व्यसनमुक्ती: धूम्रपान टाळा आणि अल्कोहोलचे सेवन मर्यादित करा, कारण हे थेट मज्जासंस्थेला हानी पोहोच-वतात.

सुरक्षा: डोक्याला दुखापत टाळण्यासाठी हेल्मेट किंवा सुरक्षिततेची साधने वापरा.

# दररोज आल्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून आश्चर्य होईल



चहामध्ये आल्याचा वापर केल्याने त्याची चव तर वाढतेच पण त्याचे आरोग्यासाठीही खूप फायदे होतात. हे पचन सुधारण्यास, सर्दी-खोकल्यावर उपचार करण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करते.

भारतीय घरांमध्ये, दिवसाची सुरुवात चहाने करणे ही केवळ सवय नसून एक भावना असते. सकाळची थंडी असो किंवा वर्तमानपत्रातील बातम्या असोत, चहा प्रत्येक घरात संभाषणाचा आधार बनतो. आणि जर चहामध्ये आले मिसळले असेल तर त्याचा आनंद द्विगुणीत होतो.

-ङडज ठए-ऊ कारल्यामुळे साखर आणि संसर्ग दोन्ही कमी होतात, खाण्यापूर्वी या खबरदारी लक्षात ठेवा

कारण आल्याच्या चहामध्ये औषधी गुणधर्म असतात जे स्वादिष्ट आणि आरोग्यासाठी फायदेशीर असतात. म्हणूनच लोक सकाळी आल्याची चहा पिणे पसंत करतात. तर, आल्याचा चहा पिण्याचे फायदे जाणून घेऊया.

आल्याच्या चहा पिण्याचे काय फायदे आहेत?

भारतीय घरांमध्ये, सकाळची सुरुवात अनेकदा गरम आल्याच्या चहाने होते . ती केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. आल्याच्या चहाने दिवसाची सुरुवात केल्याने तुमच्या पचनशक्ती आणि रोगप्रतिकारक शक्तीवर थेट परिणाम होतो.

फायदे जाणून घ्या

पचन संस्था निरोगी होते

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, आल्याचा चहा पचन सुधारतो. यामुळे गॅस, अपचन आणि पोटदुखीपासून आराम मिळतो. आल्याचा चहा, विशेषतः सकाळी रिकाम्या पोटी घेतल्यास, पाचक एंजाइम सक्रिय करण्यास मदत होते.

**शरीरात झिंकच्या कमतरताची लक्षणे, जाणून घ्या**

सर्दी आणि खोकल्यासाठी रामबाण उपाय

आल्याची चहा सर्दी, खोकला आणि फ्लूसाठी एक उत्तम घरगुती उपाय मानली जाते. त्यातील अँटीऑक्सिडंट्स शरीराला संसर्गाशी लढण्यास मदत करतात आणि नाक बंद होणे आणि कफ कमी करण्यास मदत करतात.

घसा खवखवणे आणि सूज कमी करते

आल्याची चहा घशा-तील खवखव कमी करते आणि कफ बाहेर काढण्यास मदत करते. यामुळे घशातील खवखव कमी होते. यामुळे रक्ताभिसरण देखील सुधारते, ज्यामुळे शरीराच्या अवयवांना पोषक तत्वांचा योग्य पुरवठा होतो.-ङडज ठए-ऊ कारल्यामुळे साखर आणि संसर्ग दोन्ही कमी होतात, खाण्यापूर्वी या खबरदारी लक्षात ठेवा

वजन कमी करण्यास उपयुक्त

वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी आल्याची चहा खूप फायदेशीर आहे. ती चयापचय वाढवते आणि कॅलरी बर्निंगला गती देते. नियमित सेवनाने चरबी जमा होण्याची शक्यता कमी होते.

थकवा आणि ताण कमी करते

जर तुम्हाला दिवसभर थकवा किंवा ताण जाणवत असेल, तर एक कप आल्याची चहा त्वरित आराम देऊ शकते. ती शरीराला ऊर्जा देते आणि मनाला ताजेतवाने करते.

रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते

आल्यामध्ये असलेले अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात , ज्यामुळे शरीराला रोगांशी चांगल्या प्रकारे लढण्यास मदत होते.

किती प्रमाणात पिणे योग्य आहे?

आल्याचा चहा दिवसातून २ ते ३ कप पिऊ शकता.

तथापि, जर एखाद्याला गॅस, छातीत जळजळ किंवा पोटाच्या इतर समस्या असतील तर ते कमी प्रमाणात प्यावे.

अस्वीकरण: वेबदुनियावर औषध, आरोग्य टिप्स, योग, धर्म, ज्योतिष, इतिहास, पौराणिक कथा इत्यादी विषयांवर प्रकाशित/प्रसारित होणारे व्हिडिओ, लेख आणि बातम्या केवळ तुमच्या माहितीसाठी आहेत आणि विविध स्त्रोतांकडून घेतल्या आहेत. वेबदुनिया याच्या सत्यतेची पुष्टी करत नाही. आरोग्य किंवा ज्योतिषाशी संबंधित कोणताही प्रयोग करण्यापूर्वी नेहमीच तज्ज्ञांचा सल्ला घ्या. ही सामग्री सार्वजनिक हितासाठी सादर केली गेली आहे आणि कोणत्याही वैज्ञानिक पुराव्यांद्वारे समर्थित नाही.

# भाजपचे वर्चस्व

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सातारा, परभणी, लातूर या जिल्ह्यांतही चांगले यश मिळवले. रायगड जिल्हा एकेकाळी शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला होता. तो ढासळून गेला आहे.

जिल्हा परिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने आपले निर्णायक वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. नगर परिषदा, नगर पंचायत आणि महापालिका निवडणुकांनंतर ग्रामीण भागात देखील आपलीच शक्ती असल्याचे भाजपने दाखवून दिले. राज्यात स्वबळावर सत्तेत येण्याचे भाजपचे स्वप्न आहे. त्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील मित्र पक्षांसह विरोधकांनीही धडा घ्यावा, असा हा निकाल म्हणता येईल. सिंधुदुर्ग, लातूर, परभणी, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर या जिल्हा परिषदा भाजपने जिंकल्या. शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस, यांनी प्रत्येकी दोन जिल्हा परिषदांमध्ये निर्विवाद वर्चस्व मिळवले. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ सांगलीत ताकद दाखवता आली, तर उद्धव यांच्या शिवसेनेची या निवडणुकीत धूळधाण उडाली. पुणे जिल्ह्यात अर्थातच अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकद दिसली. अजित पवार यांच्या अनपेक्षित मृत्यूमुळे 'राष्ट्रवादी'च्या बाजूने सहानुभूतीची लाट होती. ती दुर्दैवी घटना घडली नसती तरी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडेच मतदारांचा कल राहिला असता, हे अंतिम निकाल पाहिला तर लक्षात येईल. रत्नागिरीत दीर्घकाळ शहरी भागात भाजप आणि ग्रामीण भागात शिवसेना, असे चित्र होते. शिंदे यांच्या शिवसेनेने तेथे शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागही आपलाच असल्याचे दाखवून दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये राजकीय ओळख, याहीपे-क्षा स्थानिक ओळख आणि स्थानिक घटक प्रभावी असतात. त्यात बदल होत असून उमेदवारांची राजकीय ओळख महत्त्व-ाची ठरत आहे. लोकसभा निवडणुकीत





बसलेल्या फटक्यानंतर भाजपने जी सावधगिरी दाखवली, नियोजनात कोणतीही उणीव राहणार नाही याची काळजी घेतली, त्या प्रयत्नांना मिळालेले यश, म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे निकाल! राज्यात भाजपची पुढील वाटचाल अधिकाधिक आक्रमक होत जाणार आहे. विधानसभेपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपर्यंत तीनही स्तरांवर पक्षाने मिळविलेले यश त्याचाच संकेत देते. आज तरी एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेस, हे भाजपचे मित्र पक्ष आहेत. पुढील निवडणुकांना आता मोठा कालावधी आहे. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी दुसर्या राष्ट्रवादीबद्दल काय भूमिका घेणार, हे काही काळात स्पष्ट होईल; पण पुढच्या विधानसभा निवडणुकीपर्यंत कितीही बदल झाले तरी भाजपला फारसा फरक पडण्यासारखी स्थिती नाही.

**विरोधक निष्प्रभ**–राजकीय समीकरणांमध्ये झालेला हा बदल दूरगामी परिणाम करणारा असून मित्र पक्षांसमोर केव्हाही आव्हान उभे राहू शकते.

जनमानसाची नाडी अचूक ओळखू शकणारे नेते विरोधी पक्षांतही आहेत; पण विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाच्या धक्क्यातून ते सावरले आहेत, असे वाटत नाही. जनसामान्यांचे प्रश्न भाजपने सोडविले, म्हणून शहरापासून ग्रामीण भागापर्यंतचा सर्व मतदार अधिक संख्येने भाजपबरोबर गेला, ही वस्तुस्थिती नाही. भाजपकडून केल्या जाणार्या वाता-वरण निर्मिती समोर विरोधक पार निष्प्रभ होऊन जातात. अशावेळी सामान्यांचा आवाज बनण्याचे सोडून निरर्थक मुद्द्यांवर सतत बोलून ते उरलेली शक्ती वाया घालवत आहेत. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबद्दल खूप बोलता येण्यासारखे आहे; पण मतचोरीचा मुद्दा सामान्यांना पटला नाही. निवडणुकांमध्ये सतत येणार्या अपयशामुळे कोणत्याही मार्गाने पराभवाचे लंगडे समर्थन करायचे, ही मानसिकता विरोधी पक्षांमध्ये वाढली आहे.

मुंबईत भाजपने मराठी महापौर दिला. तो द्यावा लागला हा आमचाच विजय, अशी वल्गना करण्यापर्यंत काही पक्ष जात असतील, तर ते राजकीय पटलावर स्वतः चे अस्तित्व कसे टिकवणार? शेतकर्यांना कर्जमाफी देण्यासह असंख्य आश्वासनांचा पाऊस पाडत भाजप आणि महायुतीमधील मित्र पक्षांनी लढाई जिंकली. ती आश्वासने पोकळ ठरू नयेत आणि ग्रामीण भागाचे राज्यातील विकासात लक्षणीय योगदान कसे राहील याचा प्रयत्न करावा, ही अपेक्षा आहे.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

### हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी उपाय




हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जी-वनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जी-वनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. **(क्रमश. )**

## २ Joke विनोद





बंडू शाळेतून धावतच घरी आला आणि आईला म्हणाला, आई, आज वर्गात शिक्षकांच्या प्रश्नाला माझ्याशिवाय कुणीच उत्तर देऊ शकलं नाही! आईने विचारले, ङ्गअरे वा. प्रश्न काय होता. शिक्षकांच्या टेबलाचा पाय कोणी मोडला!

## ३ Message संदेश



Pappu: Papa ghar mein mehmaan aae hain aur shara-bat bnaane ke lie nemboo na-hin hai, ab kya karoon? Santa: abe, darata kyon hai? nae Vim Baar mein 100 neemboo kee shakti hai, daal de 2 boond beta!.

## ४ Thought सुविचार



प्रयास हा प्रतिभेचा प्राणवायू आहे.


– पु.ल. देशपांडे

**संस्कृत सुभाषित**

**काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।**
**व्यसने च मुर्खाणां निद्रया कलहेन वा।।**

अर्थ –बुद्धिमान लोकांचा वेळ काव्य, शास्त्र, विनोदात (विद्याप्राप्ती करण्यात, चिंतन करण्यात, चांगल्या चर्चा करण्यात आदी) व्यतीत होतो, तर व्यसनात, झोपेत किंवा भांडणात मुर्खांचा वेळ जातो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. उथळ पाण्याचा आवाज
४. नीच, पापी, दुष्ट
७. विश्रांती
१०. मळलेला
११. उफाड्याचा (बांधा)
१३. प्रामाणिक
१५. अवास्तव
१६. मिठी
१७. गावबाहेरची वस्ती
१९. तालासुराची गट्टी
२०. खाली पडू न देता, नेहमी
२१. चेहऱ्यावरील तेज
२३. प्रफुल्लित
२६. बारा वर्षांचा काळ
२८. लहान
२९. पाणकोंबडा
३०. दिखाऊ, खोलवर नसलेले
३३. चाणक्यकालीन तक्षशिला बरोबरचे एक विद्यापीठ
३५. रहस्य
३७. लोखंड घासण्याचे साधन
३९. फिरणे, चक्कर येणे
४२. अपमान
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. युवराज
४६. एकरूप
४८. बडबड
५०. चंद्र
५३. प्रश्न
५५. नवीन आलेला
५७. मृत्यू नसलेला
५८. जंगली
६०. निकट
६१. अनुमती
६३. फणसाचा एक प्रकार
६५. पाप
६८. वितरण
७०. दोन महान ग्रंथ
७२. मगज
७३. उद्याच्या नंतरचा दिवस
७४. कणीदार
७५. मोठी बहीण
७६. विठ्ठलाची पत्नी
७७. नाराजी

### उभे शब्द

१. ताकीद देणे, समज देणे
२. खंड
३. ताणलेल्या दोरीचा आवाज
४. तानाजीला मिळालेली पदवी
५. हिंमत
६. कपाळभर लावलेले कुंकू
७. कहाणीतील गाव
८. दीर्घ उच्चराने नरम
९. भ्रम
१४. नवरदेव
१५. इंद्रिय
१८. जरा उणीच!
२२. वेदना
२४. व्रत,२५. पूजेचे नक्षीदार ताट
२५अ. जहाज लुटणारे
२७. खाट, बाज
३०. सिंह, जगलाचा राजा
३१. आवड
३२. रमापती
३४. दरवाजा
३६. सापाची एक जात
३८. नीच, दुष्ट
४०. नामघोष
४१. भारुड काव्य प्रकारात रचना केलेले संत,४२. अवस
४४. मानी स्त्री
४५. राजाची पत्नी
४६. षष्ठीची देवता
४७. पावसाची धार
४८. देश, जमीन
४९. अरण्य
५१. आगबोट
५२. द्वाड, खोडकर
५३. युद्ध
५४. एक सुगंधी वनस्पती
५६. धुसफूस, त्रास
५७. पुष्कळ, खूप
५८. संतापी
५९. समीक्षा
६२. बाजेची कापडी पट्टी
६४. मर्यादा, सीमा
६५. विजार
६६. पंकज
६७. छोटे जाजम
६९. केशरी गराचे स्वस्त फळ
७१. कधी खरे, कधी खोटे ठरणारे!
७२. मासा पकडण्याचे साधन

### आडवे उत्तरे

१.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अव-हेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

### उभे उत्तरे

१.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### झंपा-एलिस जोडगोळीसमोर आयर्लंड निष्प्रभ; ऑस्ट्रेलियाची दणक्यात सलामी

दिल्ली–वर्ल्डकप जेतेपदांशी सख्य असणाऱ्या ऑस्ट्रेलियाने सलामीच्या लढतीतच आयर्लंडवर ६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. कोलंबोतल्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या लढतीत ऑस्ट्रेलियाने आयर्लंडचा धुव्वा उडवला. ऑस्ट्रेलियाने अडखळत १८२ धावांची मजल मारली. मात्र त्यानंतर अ‍ॅडम झंपा आणि नॅथन एलिस या जोडगोळीसमोर आयर्लंडच्या फलंदाजांनी सपशेल शरणागती पत्करली. त्यांना ११५ धावाच करता आल्या. ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय घेतला. मात्र प्रेमदासाच्या संथ आणि धीम्या खेळपट्टीवर ऑस्ट्रेलियाची घसरगुंडी उडाली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मिचेल मार्श दुखापतीमुळे या सामन्यात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं. मार्शच्या अनुपस्थितीत ट्रॅव्हिस हेडकडे कर्णधारपद सोपवण्यात आलं.

### भारत-नामिबिया टी-२० वर्ल्डकप सामना कधी, कुठे?

दिल्ली–भारतीय संघाने टी–२० विश्वचषक २०२६ची सुरूवात विजयाने केली आहे. पहिला सामना अमेरिकेविरूद्ध झाला होता, या सामन्यात टीम इंडियाने २९ धावांनी विजय नोंदवला. सूर्यकुमार यादव व मोहम्मद सिराज यांनी या सामन्यात मॅचविनिंग कामगिरी केली होती. आता टीम इंडियाचा पुढील सामना कधी खेळवला जाणार, सर्व माहिती जाणून घेऊया.

भारत–नामिबिया सामना किती वाजता सुरू होणार?

भारताचा पुढील सामना आता नामिबियाशी होणार आहे. आयसीसी टी–२० विश्वचषक २०२६ मधील अ गटातील हा सामना १२ फेब्रुवारी गुरूवार रोजी संध्याकाळी ७ वाजता खेळवला जाणार आहे. हा सामना दिल्लीतील अरूण जेटली स्टेडियममध्ये होणार असून संध्याकाळी ६.३० वाजता सामन्याची नाणेफेक होईल. तर भारत आणि नामिबिया सामना स्टार स्पोर्ट्स या चॅनेलवर तर जिओ हॉटस्टार या अ‍ॅपवर लाईव्ह स्ट्रिमिंग पाहायला मिळणार आहे.टी–२० विश्वचषकासाठी भारत आणि नामिबियाचे संघ–भारत–सूर्यकुमार यादव (कर्णधार), इशान किशन (यष्टीरक्षक), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, रिंकू सिंग, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह, कुलदीप यादव, संजू सॅमसन, वॉशिंग्टन सुंदर

### अफगाणिस्तानने दक्षिण आफ्रिकेला फोडला घाम, डबल सुपर ओव्हरपर्यंत रंगला सामना

**दिल्ली**–टी–२० वर्ल्डकपमध्ये आज क्रिकेट चाहत्यांना जबरदस्त रोमांचक सामना पाहण्यास मिळाला. तुलनेने दुबळ्या अफगाणिस्तान संघाने दक्षिण आफ्रिकेचा अक्षरश: घाम काढला. अफगाणिस्तानने दिलेल्या कडव्या झुंजीमुळे सामना सुपर ओव्हरपर्यंत गेला होता. मात्र नंतर सुपर ओव्हरमध्ये दक्षिण आफ्रिकेने सामना बरोबरीत सोडवला, ज्यामुळे डबल सुपर ओव्हर खेळवावी लागली. अखेर दक्षिण आफ्रिकेने ४ धावांनी हा सामना जिंकत वर्ल्डकपमधील मोठ्या पराभवाला हुलकावणी दिली. अफगाणिस्तानने विजय जवळपास खेचून आणला होता. पण थोडक्यात त्यांचा पराभव झाला.दक्षिण आफ्रिकेने प्रथम फंलदाजी करताना अफगाणिस्तानसमोर १८८ धावांचे आव्हान उभे केले होते. अफगाणिस्तान संघाला ३ चेंडूत २ धावांची गरज असताना संघ ऑल आऊट झाला आणि सामना सुपर ओव्हरमध्ये पोहोचला. यानंतर सुपर ओव्हरमध्ये अफगाणिस्तानने १८ धावांचे आव्हान दिले असताना, दक्षिण आफ्रिकेने १७ धावा केल्या आणि सामना पुन्हा सुपर ओव्हरमध्ये गेला.

पहिल्या सुपर ओव्हरमध्ये काय झाले?

सुपर ओव्हरला अजमत आणि गुरबाज यांनी फलंदाजी केली.

## मुंबईत वेस्ट इंडिजची गती नव्हे फिरकी

### फिल सॉल्टने इंग्लंडच्या गोलंदाजीवर जोरदार आक्रमण केले परंतु १४ चेंडूत ३० धावांची खेळी करून सॉल्ट तंबूत

# वेस्ट इंडिजची इंग्लंडवर ३० धावांनी दिमाखदार विजय

**नवी मुंबई:** एकेकाळी प्रतिस्पर्धी फलंदाजांच्या मनात धडकी भरवणाऱ्या वेगवान गोलंदाजांचा संघ यासाठी प्रसिद्ध वेस्ट इंडिजने टी२० वर्ल्डकप स्पर्धेत वानखेडे स्टेडियमवर गुदकेश मोटी, रॉस्टन चेस आणि अकेल हुसेन या फिरकीपटूंच्या दमदार प्रदर्शनाच्या जोरावर इंग्लंडविरुद्ध विजय मिळवला. शेरफन रुदरफोर्डच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर वेस्ट इंडिजने १९६ धावांची मजल मारली. वेस्ट इंडिजच्या फिरकीसमोर नामोहरम झालेल्या इंग्लंडने १६६ धावा केल्या. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना फिल सॉल्टने इंग्लंडच्या गोलंदाजीवर जोरदार आक्रमण केलं. १४ चेंडूत ३० धावांची खेळी करून सॉल्ट तंबूत परतला. बटलरकडून इंग्लंडला मोठ्या खेळीची अपेक्षा होती. मात्र चेसच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याचा बटलरचा प्रयत्न रोव्हमन पॉवेलच्या हातात जाऊन विसावला. गुदकेश मोटीने टॉम बँटनला झटपट माघारी परतावलं. तो दोनच धावा करू शकला. खेळपट्टीवर स्थिरावलेल्या जेकब बेथेलला मोटीनेच त्रिफळाचीत केलं. त्याने ३३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. १० षटकांमध्ये इंग्लंडला १०४ धावांची आवश्यकता होती आणि धावगतीचं आव्हान दहापल्याड गेलं होतं.

कर्णधार हॅरी ब्रूक आणि सॅम करन यांनी पडझड रोखली. धावगतीचं आव्हान वाढत असताना मोटीने ब्रूकला बाद केलं. मोटीने स्वत:च्या गोलंदाजीवर त्याचा उत्तम झेल टिपला. त्याने १७ धावा केल्या. रॉस्टन चेसने शेवटच्या षटकात विल जॅक्सला बाद करत इंग्लंडला आणखी अडचणीत टाकलं. अकेल हुसेनने शेवटच्या षटकात ओव्हर्टनला बाद केलं. त्याने ५ धावा केल्या. वेस्ट इंडिजच्या फिरकीपटूंनी अतिशय शिस्तबद्ध आणि हुशारीने मारा करत इंग्लंडच्या फलंदाजांना चकवलं. जेसन होल्डरने जोफ्रा आर्चरला धावचीत केलं.



### गुदकेश मोटी, रॉस्टन चेस आणि अकेल हुसेन या फिरकीपटूंचे दमदार प्रदर्शन

मोटीने ३३ धावांत ३ तर चेसने २९ धावांत इंग्लंडच्या २ फलंदाजांना तंबूत परतावलं. इंग्लंडने १६६ धावा केल्या.

इंग्लंडने वानखेडे स्टेडियमवर दव पडेल या अंदाजाने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. पहिल्याच षटकात वेस्ट इंडिजचा कर्णधार शे होप तंबूत परतला. जोफ्रा आर्चरने त्याला बाद केलं. त्याला भोपळाही फोडता आला नाही. पाठोपाठ ब्रँडन किंगही बाद झाला. शिमोरन हेटमायर आणि रॉस्टन चेस यांनी तिसऱ्या विकेटसाठी ४७ धावांची भागीदारी करत डाव सावरला. जेमी ओव्हर्टनने हेटमायरला बाद करत ही जोडी फोडली. त्याने २३ धावा केल्या. चेसला शेरफन रुदरफोर्डची साथ मिळाली. रशीदने चेसला पायचीत करत ही जोडी फोडली. चेसने ३४ धावा केल्या. चेस बाद झाल्यानंतर रुदरफोर्डने सूत्रं हाती घेतली. रुदरफोर्ड आयपीएल स्पर्धेत मुंबई इंडियन्स संघाचा भाग होता. इथल्या खेळपट्टीचा, वातावरणाचा अभ्यास असणाऱ्या रुदरफोर्डने एकेरी, दुहेरी धावा आणि चौकार, षटकार यांची सुरेख सांगड घातली. रुदरफोर्ड आणि रोव्हमन पॉवेल यांनी चौथ्या विकेटसाठी २९ चेंडूत ५१ धावांची भागीदारी केली.

पॉवेल बाद होताच, रुदरफोर्डला अनुभवी जेसन होल्डरची साथ मिळाली. या दोघांनी ३२ चेंडूत ६१ धावांची खणखणीत भागीदारी केली. या भागीदारीच्या बळावर वेस्ट इंडिजने पावणेदोनशेचा टप्पा ओलांडला. भागीदारीदरम्यान रुदरफोर्डने अर्धशतकाला गवसणी घातली. रुदरफोर्डने सूत्रधाराची भूमिका निभावत ४२ चेंडूत २ चौकार आणि ७ षटकारांसह नाबाद ७६ धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. होल्डरने १७ चेंडूत १ चौकार आणि ४ षटकारांसह ३३ धावा केल्या. इंग्लंडतर्फे आदिल रशीदने अवघ्या १६ धावा देत २ विकेट्स पटकावल्या. सलामीच्या लढतीत रशीदच्या गोलंदाजीवर नेपाळच्या फलंदाजांनी ४२ धावा चोपून काढल्या. रशीदला विकेटही मिळाली नव्हती. त्या सामन्यातील चुकांमधून बोध घेत रशीदने शिस्तबद्ध मारा केला. रशीदला अन्य फिरकीपटू विल जॅक्स आणि लायम डॉसन यांची साथ मिळू शकली नाही. इंग्लंडला जोफ्रा आर्चरकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी त्यालाच लक्ष्य करत ४८ धावा कुटल्या.

गतविजेत्यांमधली तुल्यबळ लढत

इंग्लंडने २०१० आणि २०२२ मध्ये टी२० वर्ल्डकपच्या जेतेपदावर कब्जा केला आहे. वेस्ट इंडिजने २०१२ आणि २०१६ मध्ये जेतेपदावर नाव कोरलं होतं. दोन गतविजेत्या संघांमध्ये तुल्यबळ लढत पाहायला मिळाली.

### सचिन तेंडुलकरला राहुल गांधींसोबतची पोस्ट डिलिट करायला लावली; काँग्रेस

मुंबई–मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा लेक अर्जुन तेंडुलकर लग्नबंधनात अडकणार असल्याच्या चर्चा २०२६पासून सुरू आहेत. अर्जुन तेंडुलकर सानिया चंडोकबरोबर लग्नबंधनात अडकणार आहे. या दोघांच्या लग्नाची तारीखही रिपोर्ट्समध्ये समोर आली होती. अर्जुन आणि सानिया यांचा साखरपुडा २०२५ मध्ये मोजक्या लोकांच्या उपस्थितीत करण्यात आळा. सचिन तेंडुलकरने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह दिल्लीतल्या दिग्गजांना विवाह सोहळ्याचं निमंत्रण दिलं. मात्र राहुल गांधींना जे निमंत्रण दिलं ती पोस्ट सचिन तेंडुलकरला डिलिट करायला लावली असा दावा काँग्रेसने केला आहे.

काय म्हटलं आहे काँग्रेसने?

सचिन तेंडुलकर मंगळवारी दिल्लीत होते. त्यांनी त्यांच्या मुलाच्या लग्नाचं निमंत्रण दिल्लीतल्या दिग्गज नेत्यांना दिलं. तसंच त्यानंतर त्यांच्या एक्स पोस्टवर फोटोही शेअर केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण दिलं, त्यांच्यासह असलेला फोटो सचिनने संध्याकाळी ७ वाजून १३ मिनिटांनी पोस्ट केला होता. तर अमित शाह यांच्यासह काढलेला फोटो ८ वाजून १८ मिनिटांनी पोस्ट केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह काढलेला फोटो ८ वाजून ४८ मिनिटांनी पोस्ट केला.

# भारताला मोठा धक्का, नामिबियाविरुद्धच्या सामन्याआधी महत्त्वाचा खेळाडू रुग्णालयात

मुंबई–भारताने अमेरिकेविरुद्धचा सामना २९ धावांनी जिंकला. आता गुरुवार १२ फेब्रुवारी रोजी भारताचा सामना नामिबिया विरोधात होणार आहे. हा सामना होण्याआधीच भारतीय संघ व्यवस्थापनाची चिंता वाढवणारी एक बातमी आली आहे. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा याला तब्येत बिघडल्यामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यामुळे नामिबिया विरोधात अभिषेक खेळण्याची शक्यता धूसर झाली आहे.

अभिषेक शर्मा ताप आला आहे आणि अशक्तपणा जाणवत आहे. अमेरिकेविरुद्धच्या सामन्याआधीपासूनच तो आजारी होता. पण त्यावेळी औषधं घेऊन खेळलेला अभिषेक आता तब्येत खालावल्यामुळे रुग्णालयात दाखल झाला



आहे. डॉक्टरांनी त्याला पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला आहे. अभिषेकवर उपचार सुरू आहेत. तब्येतीला लगेच आराम पडावा यासाठी अभिषेकला सलाईनवर ठेवले आहे. आजारी असल्यामुळे डावखुरा सलामीवीर अभिषेक शर्मा नवी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियममध्ये संघाच्या सराव सत्राला गैरहजर होता. त्याचे पोट बिघडले आहे आणि औषधोपचार सुरू आहेत असे सुरुवातीला सांगितले जात होते. पण आता अभिषेकला रुग्णालयात दाखल केल्यामुळे तो नामिबिया विरोधात खेळण्याची शक्यता कमी झाली आहे.

सध्या आयसीसी पुरुष टी ट्वेंटी वर्ल्डकपमध्ये ए ग्रुप अर्थात अ गटात पाकिस्तान पहिल्या तर भारत दुसऱ्या स्थानावर आहे. पाकिस्तानने त्यांचे दोन्ही सामने जिंकले आहेत आणि त्यांच्याकडे चार गुण आहेत. भारताने अमेरिकेविरुद्धचा सामना जिंकला आहे. यामुळे भारत दोन गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. नेदरलँडने त्यांचा दोन पैकी एक सामना जिंकला आहे. यामुळे ते तिसऱ्या स्थानावर आहेत. नामिबिया चौथ्या तर अमेरिका पाचव्या स्थानावर आहे.

# द. आफ्रिकेचा डबल सुपर ओव्हरमध्ये थरारक विजय

अहमदाबाद–अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर बुधवारी क्रिकेट इतिहासातील सर्वात नाट्यमय आणि चित्तथरारक सामना पाहायला मिळाला. टी–२० विश्वचषक २०२६ मधील या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने अफगाणिस्तानचा 'डबल सुपर ओव्हर'मध्ये पराभव करत ऐतिहासिक विजय नोंदवला. पहिल्या सुपर ओव्हरमध्ये दोन्ही संघांनी १८–१८ धावा केल्याने सामना पुन्हा टाय झाला. त्यानंतर दुसरी ओव्हर खेळवली गेली. दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये मात्र अखेरच्या चेंडूवर ५ धावांची गरज असताना रहमानुल्ला गुरबाज झेलबाद झाला आणि दक्षिण आफ्रिकेने सामना जिंकला. टी–२० विश्वचषकाच्या इतिहासात दोन वेळा सुपर ओव्हर खेळण्याची ही पहिलीच वेळ ठरली. फॉर्मात असलेल्या एडन मार्करमनला (५) स्वस्तात माघारी पाठवल्यानंतर अफगाणिस्तानी आनंदात होती. पण, क्विंटन डी कॉक व रायन रिकेल्टनच्या ११२ धावांच्या भागीदारीने सामना आफ्रिकेच्या बाजूने फिरवला. राशिद खानने १३ व्या षटकात मॅच पुन्हा अफगाणिस्तानच्या बाजूने झुकवली. त्याने दोन्ही सेट फलंदाजांना एकाच षटकात बाद केले. क्विंटनने ४१ चेंडूंत ५ चौकार व ३ षटकारासह ५९ धावांवर, तर रिकल्टन २८ चेंडूंत ५ चौकार व ४ षटकारांसह ६१ धावांवर बाद झाला.

डेव्हॉल्ड ब्रेव्हिस (२३), मार्को यान्सने (१६) व डेव्हिड मिलर (२०) यांच्या योगदानाच्या जोरावर आफ्रिका ६ बाद १८७धावांपर्यंत पोहोचले. अझमतुल्लाह ओमारझाईने ३, तर राशिदने दोन विकेट्स घेतल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना अफगाणिस्तानने ५२ धावांवर ३ विकेट्स गमावल्या. सलामीवीर रममनुल्लाह गुरबाझ मैदानावर उभा राहिला आणि त्याने ४२ चेंडूंत ४ चौकार व ७ षटकारांसह ८४ धावांची दमदार खेळी केली. अझमतुल्लाह (२२) व राशिद (२०) यांनी चांगले योगदान दिले.

शेवटच्या षटकात विजयासाठी १३ धावा हव्या असताना कागिसो रबाडाने नो बॉल व व्हाईड बॉल फेकला. त्यानंतर दुसऱ्या चेंडूवर नूर अहमदने षटकार खेचून सामना ४ चेंडूंत ५ धावा असा जवळ आणला. चौथ्या चेंडूवर नो बॉल पडला अन् दोन धावा मिळाल्या. २ चेंडू ३ धावा असा सामना जवळ आला. चौथ्या चेंडूवर दुसरी धाव घेताना फझलहक फारूकी रन आऊट झाला आणि १८७ धावांवर अफगाणिस्तान संघ सर्वबाद झाला. सुपर ओव्हर काय घडले?

अझमतुल्ला ओमारझाईने पहिल्या दोन चेंडूवर ४ व ६ खेचला. पुढील दोन चेंडूंवर एकेक धाव आली. त्यानंतर चौकार व एक धाव घेताना अफगाणिस्तानने १७ धावा फलकावर चढवल्या. आफ्रिकेला ६ चेंडूंत १८ धावा करायच्या होत्या. डेव्हिड मिलर आणि डेव्हॉल्ड ब्रेव्हिस ही जोडी मैदानावर आली. मिलरने पहिला फुलटॉस चेंडू मिस केला आणि एक धाव मिळाली. ब्रेव्हिसने दुसरा चेंडू पुल शॉटवर सीमापार पाठवला. तिसऱ्या चेंडूवर फझलहक फारूकी स्लोव्हर बाऊन्सर फेकला अन् ब्रेव्हिस पुल शॉट मारण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. तर आफ्रिकेला ३ चेंडूंत ११ धावा करायच्या होत्या. त्रिस्तान स्तब्सने चौकार खेचला, परंतु पुढचा चेंडू निर्धाव राहिला. १ चेंडू ७ धावा असा सामना आलेला असताना स्तब्सने षटकार खेचला आणि सामना दुसऱ्या सुपर ओव्हरमध्ये गेला.

दुसरी सुपर ओव्हर अझमतुल्लाह ओमारझाईचा पहिलाच चेंडू त्रिस्तान स्तब्सने षटकार खेचला, नंतर एक धाव काढून डेव्हिड मिलरला स्ट्राईक दिली. मिलरने तिसऱ्या चेंडूवर चतुराईने दोन धावा काढल्या. त्यानंतर मिलरने सलग दोन षटकार हाणले. शेवटच्या चेंडूवर दोन धावा घेत आफ्रिकने २४ धावांचे लक्ष्य ठेवले. मिरलने ४ चेंडूंत १६ धावा, तर स्तब्सने २ चेंडूंत ७ धावा केल्या.

# नाशिकचा तेजस्वी तारा, महाराष्ट्राच्या तीन विजयात या खेळाडूची तीन अर्धशतके

या स्पर्धेत महाराष्ट्राकडून सलामीला खेळणाऱ्या नाशिकच्या तेजस्विनी बाटवालने आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. तेजस्विनी एक उत्कृष्ट यष्टीरक्षकही आहे.

**तेजस्विनी बाटवालची उत्तम कामगिरी**

नाशिक: पुरुषांप्रमाणेच नाशिकच्या महिला क्रिकेट खेळाडू राष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत. सध्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) वरिष्ठ महिला एक दिवसीय सामन्यांची स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेत महाराष्ट्र वरिष्ठ महिला संघाचे प्रतिनिधित्व करताना नाशिकची एक खेळाडू सातत्याने आपल्या बॅटचे पाणी प्रतिस्पर्ध्यांना पाजत आहे. तिच्या दमदार फलंदाजीमुळे महाराष्ट्राने या स्पर्धेत सलग तिसऱ्या विजयाची नोंद केली आहे. विशेष म्हणजे या महिला खेळाडूने स्पर्धेत सलग तीन अर्धशतक झळकावून आपले कर्तृत्व सिध्द केले आहे.

पुरुषांप्रमाणेच महिला क्रिकेटला सध्या सुगीचे दिवस आले आहेत. महिला खेळाडूंनाही पालकांकडून प्रोत्साहन मिळू लागले आहे. त्याप्रमाणे महिला खेळाडूंच्या कामगिरीकडेही आता सर्वजण लक्ष ठेवून असतात. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयतर्फे आयोजित वरिष्ठ महिला एक दिवसीय सामन्यांच्या स्पर्धेत राजकोट येथे ६ ते १८ फेब्रुवारी या कालावधीत महाराष्ट्र संघाचे साखळी सामने होत आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्राकडून सलामीला खेळणाऱ्या नाशिकच्या तेजस्विनी बाटवालने आपल्या कामगिरीची छाप पाडली आहे. तेजस्विनी एक उत्कृष्ट यष्टीरक्षकही आहे.या स्पर्धेत आसामवरील महाराष्ट्राच्या विजयात तेजस्विनीने दमदार ७० धावा करून लागोपाठ तिसरे अर्धशतक झळकावले. आसाम संघाने प्रथम फलंदाजी करत ४५ षटकांत ७ बाद २०१ धावा केल्या. सलामीच्या खुशी शर्मा ८१ व अमोन्तिका मुंडाच्या ५२ धावांनंतर कोणीच





विशेष चमक दाखवू शकले नाही. मुक्ता मगरेने २ गडी बाद केले. महाराष्ट्राने विजयासाठीच्या २०२ धावा सलामीला खेळणाऱ्या तेजस्विनी बाटवालच्या ९ चौकरांसह ७० तसेच गौतमी नाईक व कर्णधार अनुजा पाटील यांच्या अर्धशतकांच्या जोरावर केवळ ३०.१ षटकांत ८ गडी राखून सहज पार केल्या. यासह महाराष्ट्राने पुदुचेरी व उत्तर प्रदेश पाठोपाठ आसामवरील मोठ्या विजयाने आपल्या सलग तिसऱ्या विजयाची देखील नोंद केली.नाशिकच्या तेजस्विनी बाटवालने याआधी उत्तर प्रदेशवरील विजयात जोरदार ८३ धावा केल्या होत्या. उत्तर प्रदेश संघाने प्रथम फलंदाजी करत ४९.१ षटकांत २७६ धावा केल्या होत्या. महाराष्ट्रातर्फे यष्टीरक्षक तेजस्विनी बाटवालने यष्टीमागे दोन गडी बाद करण्यात वाटा उचलला. महाराष्ट्राने विजयासाठीच्या २७७ धावा सलामीच्या तेजस्विनी बाटवालच्या १० चौकरांसह ८३, कर्णधार अनुजा पाटीलच्या नाबाद ५३ व मुक्ता मगरेच्या ४८ धावांच्या जोरावर ४८.१ षटकांत ६ गडी राखून पार करत लागोपाठ दुसऱ्या विजयाची नोंद केली. तेजस्विनीने पहिल्या गड्यासाठी ८४ व दुसऱ्या गड्यासाठी ८९ धावांच्या महत्वपूर्ण भागीदाऱ्या केल्या. स्पर्धेतील पहिल्या सामान्यात तेजस्विनी बाटवालने पुदुचेरीवरील विजयात अर्धशतक झळकावून मोठा वाटा उचलला. पुदुचेरी संघाने प्रथम फलंदाजी करत ४८.२ षटकांत १७९ धावा केल्या.यष्टीरक्षक तेजस्विनी बाटवालने ३ झेल टिपले. विजयासाठीच्या १८० धावा सलामीच्या तेजस्विनी बाटवालच्या ९ चौकरांसह ५३, तेजल हसबनीसच्या नाबाद ६३ व कर्णधार अनुजा पाटीलच्या नाबाद ३३ धावांच्या जोरावर केवळ २९.२ षटकांत फटकावून महाराष्ट्राने ८ गडी राखून मोठा विजय मिळवला. तेजस्विनीने पहिल्या दोन गड्यांसाठी अर्धशतकी भागीदारी केल्या.तेजस्विनी बाटवालच्या फलंदाजीतील या सातत्यपूर्ण कामगिरीबद्दल नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष विनोद शहा, सचिव समीर रकटे यांनी तसेच संघ प्रशिक्षक व जिल्हा क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# सन २०२६-२७ साठी जिल्हा वार्षिक योजनेचा ५११ कोटींचा प्रारूप आराखडा मंजूर !

## * विहित कालावधीत निधी खर्चासाठी नियोजनबद्ध काम करा- पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले
## * सन २०२५-२६ मधील पुनर्विनियोजन, जानेवारी अखेरच्या खर्चास मंजुरी
## * प्रत्येक काम दर्जेदार व गुणवत्तापूर्ण करण्याच्या सूचना

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हा वार्षिक योजनेतून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली कामे विहित कालावधीत पूर्ण होण्यासाठी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांनी नियोजनबद्ध काम करावे. कोणत्याही स्थितीत निधी अखर्चित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. यासोबतच प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होईल, याची काळजी घ्यावी, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.



आमदार विक्रम काळे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. तसेच सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे हे दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीमध्ये सहभागी झाले होते.

नागरिकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित कामे विहित कालावधीत पूर्ण होणे गरजेचे आहे. या कामांमध्ये गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड किंवा हयगय होणार नाही, याची दक्षता संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुखांनी घ्यावी, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. तसेच कंत्राटदारांकडून मुदतीत कामे पूर्ण केली जात नसल्यास त्यांच्यावर संबंधित विभागाने कठोर कार्यवाही करावी. एखादा कंत्राटदार मुदत संपूनही काम पूर्ण अथवा सुरु करत नसेल तर असे काम विहित मार्गाने इतर कंत्राटदाराला देवून लवकरात लवकर पूर्ण करून घ्यावे. विनाकारण विलंब करणाऱ्या कंत्राटदारांना पुन्हा जिल्ह्यात नवीन काम देवू नये, अशा सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

लातूर शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली काढण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, स्व. विलासराव देशमुख मार्ग आणि बाह्यवळण रस्त्याच्या कामाला गती द्यावी. छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकाच्या धर्तीवर लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील रस्ते, उड्डाणपुलाचे काम करण्यासाठी प्रारूप आराखडा तयार करावा. या आराखड्याचे संबंधित लोकप्रतिनिधींसमोर सादरीकरण करून त्यांच्याही सूचना घ्याव्यात, असे पालकमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केल्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामासाठी अतिरिक्त निधीचा प्रस्ताव, तसेच माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या स्मारकाचा प्रस्ताव महानगरपालिकेने तातडीने शासनाला सादर करावा. यासाठी राज्य शासनामार्फत निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. बाह्यवळण रस्त्याच्या ८ किलोमीटर लांबीच्या रस्त्यासाठी आवश्यक भूसंपादनाची कार्यवाही गतीने करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### रस्ते, सिंचन प्रकल्प दुरुस्तीसाठी निधी द्यावा : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

अहमदपूर, चाकूर तालुक्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे. तीर्थवाडी ते चाकूर रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सोडविण्याला प्राधान्य देण्यात यावे, या रस्त्याच्या कामाला निधी उपलब्ध करून दिल्यास नागरिकांची गैरसोय दूर होईल. तालुक्यातील विविध ठिकाणी वीज उपकेंद्रांची कामे मंजूर आहेत.

मात्र, अनेक कामे अद्यापही सुरु झालेली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना अखंडित वीज पुरवठा होत नसल्याची बाब सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी मांडली. अतिवृष्टी काळात अहमदपूर, चाकूर तालुक्यातील सिंचन तलावांचे सांडवे फ ुटले आहेत. या सांडव्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रातील आवश्यक सुविधांसाठीही निधी उपलब्ध करून द्यावा, असे सहकार मंत्री म्हणाले.

ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती तातडीने करणे आवश्यक आहे. काही रस्त्यांची कामे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. तसेच अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर सौरकृषी पंप द्यावेत, असे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी सांगितले. तसेच लातूर शहरात भुयारी गटार योजनेसाठी खोदलेल्या रस्त्यांची योग्य प्रकारे दुरुस्ती करण्याची सूचना त्यांनी केली.

अतिवृष्टीमुळे रस्ते, विद्युत रोहीत्रांचे नुकसान झाले असून दुरुस्तीसाठी वाढीव निधीची आवश्यकता आहे. याबाबतची मागणी राज्यस्तरीय बैठकीत करावी. तसेच सध्या इयत्ता बारावी, इयत्ता दहावी परीक्षा काळात वीज पुरवठा खंडित होवू नये, याची दक्षता घ्यावी, असे आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

लातूर शहराच्या बाह्य वळण रस्त्याचा प्रलंबित प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा. त्यासाठी आवश्यक कार्यवाही गतीने पूर्ण करावी. लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाला गती द्यावी. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही लवकर व्हावी, असे आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी म्हणाले.

मुख्यमंत्री महोदय देवेंद्र फडणवीस यांनी माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे स्मारक उभारण्याची ग्वाही दिली आहे. त्यानुसार महानगरपालिकेने जागा निश्चित करून याबाबतचा प्रस्ताव शासनाला पाठवावा. ग्रामीण भागात जल जीवन मिशनची कामे अपूर्ण ठेवणाऱ्या कंत्राटदारांवर जिल्हा परिषदेने कठोर कार्यवाही करावी, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले. तसेच जिल्हा परिषद शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह उभारणी, शाळांमध्ये सौर ऊर्जा वापरावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले.

उदगीर, जळकोट तालुक्यातील निजामकालीन शाळांच्या इमारतींची तातडीने दुरुस्ती होणे गरजेचे आहे. यासोबतच उदगीर येथे उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुद्ध विहार परिसरात विद्युत रोषणाई करण्याच्या कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, असे आमदार संजय बनसोडे यांनी सांगितले.

तसेच उदगीर तालुक्यात अल्पसंख्याक विभागामार्फत मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. या इमारतीच्या अंतर्गत फर्निचर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्यास हे वसतिगृह सुरु करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

औसा मतदारसंघामध्ये ११ विद्युत उपकेंद्रांची कामे मुदत संपूनही पूर्ण झालेली नाहीत. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराकडून ही कामे काढून घेऊन निकषात बसणाऱ्या दुसऱ्या एजेन्सीकडून पूर्ण करून घ्यावीत अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी केली. लातूर शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच गंजगोलाई परिसरात अतिक्रमणमुक्तीसाठी महानगरपालिकेने तत्काळ आवश्यक कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जमीन उपलब्ध नाही, तिथे जमिनीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच जमीन उपलब्ध असलेल्या गावांमध्ये स्मशानभूमी शेड उभारणीसाठी निधी देवून पूर्ण जिल्ह्यातील स्मशानभूमीचा विषय मार्गी लावावा, असे आमदार रमेश कराड म्हणाले. जिल्हा परिषद शाळेतील स्वच्छता गृहांना नियमित पाणी पुरवठा करण्यासाठीही ठोस उपाययोजना हाती घ्यावात. अतिवृष्टीमुळे वाहून गेलेल्या रस्ते, पुलांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी सन २०२५-२६ मध्ये ३१ जानेवारी २०२६ अखेर जिल्हा वार्षिक योजनेतून झालेल्या खर्चाची व सन २०२६-२७ मध्ये प्रस्तावित कामांची माहिती दिली.

### माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच दोन मिनिटे मौन पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

### विमानतळ, रेल्वे स्थानक विकासासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष सुरु करण्याची मागणी करणार

जिल्हा नियोजन समितीमध्ये लेखाशीर्ष नसल्याने जिल्ह्यातील विमानतळ, रेल्वे स्थानकांमधील विकास कामांसाठी जिल्हास्तरावर निधीची तरतूद करता येत नाही. त्यामुळे जिल्हा नियोजन समितीमध्ये या बाबींसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष सुरु करण्याची विनंती करणार असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यावेळी म्हणाले. त्यामुळे रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी काही प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधी उपलब्ध करून देता येईल. तसेच विमानतळ विकासाला मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

### ऊर्जा संवर्धन पुरस्कार, ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत कामगिरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन

राज्य शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्वोत्कृष्ट पाच जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाचा समावेश करण्यात आला. तसेच ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना ऊर्जा मंत्रालयाचा 'ऊर्जा संवर्धन पुरस्कार २०२४-२५' जाहीर झाला आहे. यानिमित्त जिल्हा नियोजन समिती बैठकीत जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांचे अभिनंदन करण्यात आले.

### पुढील वर्षासाठी ५११ कोटी ५४ लाख रुपयांचा आराखडा; वाढीव निधीसाठी प्रयत्न

लातूर जिल्ह्यासाठी सन २०२६-२७ करिता जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ३८३ कोटी ३१ लाख रुपये, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती घटक कार्यक्रम) अंतर्गत १२५ कोटी रुपये आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत ३ कोटी २३ लाख रुपये अशा एकूण ५११ कोटी ५४ लाख रुपयांच्या प्रारूप आराखड्याला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामध्ये जिल्हा विकास आराखड्यासाठी २५ टक्के निधी प्रस्तावित केला असून याअंतर्गत जिल्ह्यात कृषी व संलग्न सेवा, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील विविध कामांवर भर देण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले रस्ते, अंगणवाडी, शाळा दुरुस्तीसह जिल्ह्यास आवश्यक ग्रामविकास, वने, पशुसंवर्धन, ऊर्जा विकास, वैद्यकिय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य, लघु पाटबंधारे, सामान्य शिक्षण, नगर विकास पर्यटन, यात्रास्थळ आदी क्षेत्रांच्या विकासासाठी शासन स्तरावर २१६ कोटी ६९ लाख रुपयांची वाढीव मागणी राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले.

# संगीत परीक्षेसाठी फॉर्म भरण्याचे आवाहान

**लातूर/प्रतिनिधी :** संगीत क्षेत्रातील गायन ,वादन, नृत्य या कलाक्षेत्रातील इयत्ता १० बोर्ड परीक्षेत शास्त्रीय संगीतातील वाढीव सवलतीच्या गुणांसाठी व संगीत विशारद या पदवीसाठी संगीत क्षेत्रातील कला अवगत करत असणाऱ्यांनी पात्र प्रमाणपत्रासाठी परीक्षा फॉर्म भरण्याचे आवाहान येडशी येथील मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा) सस्ते वारकरी सेवा मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे .



संगीत क्षेत्रातील शिक्षण घेत असलेले विद्यार्थी ,छंद जोपासत व करिअर म्हणून भविष्य घडवत आसणाऱ्या कलावंतानी पात्र प्रमाणपत्रासाठी परीक्षा फॉर्म भरून विविध योजणेत पात्र होण्यासाठी पात्रता प्राप्त करावि यामुळे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत ही होते व भविष्यात यशस्वी होण्यासाठी त्यांना या कलेचा फायदा होतो परंतु काही विद्यार्थ्यांना व संगीतकला अवगत असणाऱ्यांना याच्या लाभाबाबत मार्गदर्शन मिळत नसल्याने किंवा वेळेत जागृत न राहिल्याने ते शैक्षणिक व स्वयंरोजगारीत लाभार्थी योजना पासून वंचित राहाण्याची वेळ येते .यामुळे त्यांना आर्थिक मानसिक नुकसान ही सहन करावे लागते यासाठी या योजनेचा भविष्यात लाभ होण्यासाठी संगीत परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची आवाहान मृदंगाचार्य जालिंदर (बप्पा ) सस्ते वारकरी सेवा मंडळ संचलित संगीत विद्यालयाचे प्रमुख श्री महादेव सस्ते संपर्क ८२७५२७२८९५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे .

# नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचा भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भातांगळी जिल्हा परिषद गटातून महादेव साळुंके, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, भादा गटातून सौ. छायाबाई पद्माकर चिंचोलकर तसेच भातांगळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता राजकिरण साठे आणि बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांनी विजय मिळविला.

भाजपा लातूर मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात अल्या. प्रारंभी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील आणि सुरज शिंदे यांनी सत्कार केला.

याप्रसंगी भातांगळी जिप गटातील महादेव साळुंके, खरोळा जिप गटातील महेंद्र गोडभरले, भादा जिप गटातील पद्माकर चिंचोलकर आणि भातागळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता यांच्या वतीने राजकारण साठे यांनी तर बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांच्या वतीने बंधू हनुमंत गव्हाणे यांनी सत्कार स्वीकारला.

याप्रसंगी भाजपाचे साहेबराव मुळे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, किरण मुंडे, ॲड. सतीश बिराजदार, सोमनाथ पावले, गोविंद मुंडे, ओम चव्हाण, बालाजी गवळी, सुभाष राठोड, महादेव मुळे, रमेश पाटील, श्रीराम साळुंके यांच्यासह अनेकजण होते.

# शक्तिपीठ महामार्गासाठी शेतकऱ्यांवर होत असलेली जबरदस्ती व दडपशाही तात्काळ थांबवावी

## रेणापूर तालूका काँग्रेस कमिटीचे माजी आमदार धिरज देशमुख यांच्या सुचनेनुसार तहसीलदारांना निवेदन

**रेणापूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात प्रस्तावित शक्तिपीठ महामार्ग प्रकल्पाच्या अनुषंगाने लातूर तालुक्यातील मोरवड तसेच रेणापूर, औसा तालुक्यातील कवठा केज, नाहोली भेटा, अंधोरा यासह अन्य गावांमध्ये प्रशासनाकडून शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी जबरदस्तीने करण्याचा प्रयत्न सुरू असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत.ही बाब लक्षात घेऊन माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांच्या सुचनेनुसार रेणापूर तालूका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रमोद कापसे व शिष्टमंडळाने रेणापूर तहसीलदार यांची भेट घेवून निवेदन देवून शेतकऱ्यांना नाहक त्रास देवूनये अशी मागणी केली.



निवडणुकांच्या काळात थांबलेली ही प्रक्रिया निवडणुका संपताच अचानक वेगाने सुरू करण्यात आली असून त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व अस्वस्थता निर्माण झाली आहे.

शक्तिपीठ महामार्ग बाधित संघर्ष समितीतील गजेंद्र येळकर, बालाजी हाके पाटील, दिलीप कुलकर्णी, विजय कुलकर्णी व इतर कार्यकर्त्यांना रेणापूर पोलीस स्टेशनमार्फत प्रतिबंधात्मक नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. सोबतच विविध गावांतील शेतकऱ्यांनाही देखील नोटिसा पाठवून दबाव टाकण्यात येत आहे. कोणतीही सविस्तर चर्चा, योग्य मोबदल्याची हमी, लेखी आश्वासन किंवा पारदर्शक प्रक्रिया न राबविता मोजणी लादली जात असल्याची बाब गंभीर आहे.

महामार्ग प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने संपादित करण्याचा प्रयत्न लोकशाही तत्वांना धरून नाही. प्रशासनाने संवादाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी पोलिसी दबावाचा अवलंब केल्यास सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. शेतकरी आधीच नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च व बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्यावर अतिरिक्त मानसिक व प्रशासकीय दबाव टाकणे अन्यायकारक आहे.

शेतकऱ्यांवरील जबरदस्तीची मोजणी व पोलिसी कारवाई तात्काळ थांबवावी. संबंधित गावांमध्ये प्रशासन, लोकप्रतिनिधी व शेतकरी यांच्यात खुली व पारदर्शक चर्चा आयोजित करावी. शेतकऱ्यांवरील प्रतिबंधात्मक नोटिसांचा पुनर्विचार करून अन्यायकारक कारवाई मागे घ्यावी अन्यथा तिव्र आंदोलन काँग्रेस पक्षाकडून केले जाईल असे रेणापूर तालूका काँग्रेस कमिटी कडून देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. यावेळी गोविंद पवार, शहर अध्यक्ष पदम पाटील, माने केशव, प्रकाश पाटील, उमाकांत खलंग्रे सभापती लतीफ शेख, रमेश शिंदे, सचिन इंगळे, संतोष शिंदे,बालाजी हाके, किरण पवार, ॲड. तानाजी कणसे, दिनेश पाटील, चंद्रकांत कातळे, सचिन मोटेगावकर, ॲड मुरलीधर पडोळे, मुकुंद सूर्यवंशी, दिग्विजय पाटील, प्रदीप काळे, आब्रिश भिसे, ज्ञानेश्वर कुसुंबे,राजकुमार कांबळे, राहुल पाटील, ॲड शिरगिरे, बिभीषण कदम, कल्याण शाहीर, दीपक जगदाळे आदींची उपस्थिती होती.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सैनिकी मुलांच्या वसतीगृहात अशासकीय अधिक्षक पदासाठी माजी सैनिकांना संधी

धाराशिव (जिमाका)-जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सैनिकी मुलांच्या वसतीगृहात अशासकीय वसतिगृह अधिक्षक पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.हे पद निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असून एकत्रिक मानधनावर भरण्यात येणार आहे.

या पदासाठी पात्र आणि इच्छुक माजी सैनिक (गउजी) यांनी स्वतःची मूळ कागदपत्रे,डिस्चार्ज बुक,पी.पी.ओ.,माजी सैनिक ओळखपत्र तसेच आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांसह दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धाराशिव येथे अर्ज सादर करावेत.

कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ११ वाजता पात्र उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या दूरध्वनी क्रमांक ०२४७२-२२२५५७ किंवा ७५८८५२७५५४ वर संपर्क साधावा,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,धाराशिव यांनी केले आहे.

# प्रस्तावित कर्ज निवारण योजनेसाठी शेतकऱ्यांनी तातडीने आवश्यक माहिती सादर करावी

धाराशिव,दि.११ फेब्रुवारी (जिमाका ) राज्यातील शेती क्षेत्रात तसेच शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी शासनामार्फत अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांच्या अनुषंगाने प्रस्तावित कर्ज निवारण योजनेची आखणी करण्यात येत आहे.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती मागविली असून,त्यानुसार विहीत नमुना प्रपत्र 'अ' व 'ब' मध्ये माहिती संकलनाचे काम सुरु आहे.

या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा सेवा सहकारी संस्था तसेच धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा स्तरावर थकीत कर्जदार सभासदांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.सेवा सहकारी संस्थांच्या पातळीवर थकीत सभासदांच्या कर्ज खात्यांबाबत तसेच इतर अनुषंगिक माहिती गोळा केली जात आहे.

मात्र,सेवा सहकारी संस्थांचे थकीत कर्ज असलेल्या बहुतांश सभासदांनी अद्याप संबंधित संस्थेच्या सचिवांशी संपर्क साधून त्यांचे आधार कार्ड, फार्मर आयडी तसेच इतर आवश्यक माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्याने माहिती संकलनात अडथळे येत आहेत.परिणामी,संस्था पातळीवर आवश्यक माहिती पूर्णपणे संकलित करता आलेली नाही.

जिल्ह्यातील ज्या थकीत कर्जदार शेतकरी सभासदांनी अद्यापही त्यांचे आधार कार्ड,फार्मर आयडी व अन्य आवश्यक माहिती संबंधित सेवा सहकारी संस्था किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेला उपलब्ध करून दिलेली नाही,त्यांनी तातडीने संबंधित संस्थेचे सचिव किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखेचे वसुली अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे व माहिती सादर करावी,असे आवाहन जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, धाराशिव यांनी केले आहे.

# सावरगाव (दरेवाडी) येथे अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता



भूम (प्रतिनिधी)- जीवाने शिवस्वरूप होणे, ही अवस्था म्हणजेच काला होय. सात्विक काल्याच्या प्रसादाने सात्विक बुद्धी होते, चांगल्या बुद्धीतूनच सात्विक विचार येतात, सात्विक विचारामुळे सात्विक आचरण होते त्यामुळे काल्याचा प्रसाद कुणालाही मिळणे शक्य नाही तर ही भाग्यवान लोकांनाच त्याची प्राप्ती होते, काल्याचा प्रसाद म्हणजे केवळ दही लाह्याचा प्रसाद नसून तो भगवंताचा आत्मशुद्धीकरिता दिलेला प्रसन्नतेचा प्रसाद आहे, असे हभप माधव महाराज बोधले यांनी सांगितले.

भूम तालुक्यातील सावरगाव (दरेवाडी) येथील आयोजित अखंड हरिमान सप्ताहनिमित्त आयोजित काल्याच्या कीर्तनात उपस्थित भक्तांना मार्गदर्शनावेळी ते बोलत होते. भूम तालुक्यातील सावरगाव (दरेवाडी) येथे दि.३१ जानेवारी ते ९ फेब्रुवारीपर्यंत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहासाठी सावरगावसह परिसरातील भक्तगण सहभागी झाले होते. सप्ताहनिमित्त गावात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ५ संगीतमय श्रीरामकथा व सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ व त्यानंतर रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर असा दिनक्रम होता. रविवारी ८ फेब्रुवारी रोजी हभप गुरुवर्य नारायण महाराज बोधले गौरकर यांचे काल्याचे किर्तनाचे सप्ताहाची सांगता झाली. पुढे बोलताना हभप माधव महाराजांनी भगवंताचा प्रसाद म्हणजे अंतःकरणाची प्रसन्नता होय, मन प्रसन्न करून घ्यायचे तर भगवंताचे नामस्मरण हा सर्वोत्तम पर्याय आहे. माणसाच्या मनातील कलुष्यता दूर करण्याकरीता मनाची पवित्रता, शुद्धता गरजेची आहे. ती भगवान श्रीकृष्णांच्या नावाने होते. गोकुळातील सर्वांना शुद्धता प्राप्त झाल्याचे सांगून आध्यात्माचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्व सांगून विविध दाखले दिले. परमार्थ माणसाच्या आयुष्यात सुख-शांती आणते, आध्यात्मिक सुखाची तुलना धन सपंत्तीमुळे मिळू शकत नसल्याचे सांगितले.

फुगड्या घालत टाळ मृदंगाच्या गजरात निघाली दिंडी भूम तालुक्यातील सावरगाव दरे. येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता रविवारी दिंडी प्रदक्षिणाने झाली. सकाळी ८ ते १० वाजता गावातील जिल्हा परिषद शाळेसमोरून दिंडी प्रदक्षिणेला सुरुवात झाली.

यावेळी भक्तांनी फुगड्या घालून टाळ -मृदुंगाच्या गजरात निघालेल्या दिंडी प्रदक्षिणेने गावकऱ्यांचे लक्ष वेधले. ही दिंडी नरसिंह मंदिर, मारुती मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिरासमोरुन परत जि.प. शाळेसमोर प्रदक्षिणेची सांगता झाली. यानंतर हभप माधव महाराज बोधले गौरकर यांचे काल्याचे किर्तनानंतर दीड हजार भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला.

# रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेल्या अॅटोचालकावर गुन्हा दाखल

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत इस्माईल रा. कुरेशी गल्ली नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१०.०१.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील अॅटो रिक्षा ही वाहने नळदुर्ग बसस्थानक परिसरात उजव्या गेटसमोर रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द नळदुर्ग पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

# धाराशिव झेडपी अध्यक्षपदाचा महासंग्राम! राणा दादा-शिंदे गट-तानाजी सावंत यांच्या राजकीय हालचालींनी रंगला सत्तेचा थरार



**लातूर समाचार स्पेशल रिपोर्ट**
**रामेश्वर डोंगरे**

जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड आता केवळ औपचारिक राहिलेली नाही; ती थेट प्रतिष्ठेची आणि ताकदीची लढत बनली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात सध्या पडद्यामागील बैठका, गुप्त चर्चा आणि रणनीतींचा धडाका सुरू असून प्रत्येक गट आपापले आकडे घट्ट करण्याच्या प्रयत्नात आहे. या साऱ्या घडामोडींमध्ये राणा दादा पाटील, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिंदे गट, तसेच तानाजी सावंत यांचे नाव निर्णायक केंद्रबिंदू ठरत आहे.

जिल्हा परिषदेतले संख्याबळ एकीकडे एका बाजूने स्थिर दिसत असले तरी राजकारणातील अंतिम क्षणी होणाऱ्या 'टर्न'ची भीती सर्वांनाच आहे. शिंदे गटाच्या रणनीतीला राणा दादांची स्थानिक पकड आणि तानाजी सावंत यांचे संघटनबळ जोडले गेले तर समीकरणे एका क्षणात बदलू शकतात, अशी चर्चा जिल्हाभर रंगली आहे.

धाराशिवच्या राजकारणात सध्या तीन पातळ्यांवर अंदाज व्यक्त केला जात आहे. पहिली म्हणजे आकड्यांची बेरीज-वजाबाकी, दुसरी म्हणजे नाराज सदस्यांना साधण्याची कसरत, आणि तिसरी म्हणजे बाह्य दबाव व प्रतिष्ठेचा प्रश्न. अध्यक्षपदाची खुर्ची ही केवळ पद नसून आगामी राजकीय समीकरणांसाठीचा पाया मानली जात आहे. त्यामुळे प्रत्येक मताचे मुल्य वाढल्याचे दिसून येत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही सदस्यांशी सुरू असलेल्या चर्चांमुळे सत्तेचे गणित शेवटच्या टप्प्यात अधिक गुंतागुंतीचे झाले आहे. राणा दादांच्या हालचालींना शिंदे गटाचा पाठिंबा आणि तानाजी सावंत यांच्या समर्थकांची मूक साथ मिळाली तर अध्यक्षपदाचा मार्ग सुकर होईल, असा अंदाज व्यक्त केला जातो. मात्र विरोधी गटही 'अंतिम डाव' टाकण्यासाठी सज्ज असल्याचे संकेत आहेत.

धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्षपदाची निवड आता राजकीय सत्तासमीकरणाचा लिटमस टेस्ट ठरणार आहे. कोणाच्या शब्दाला किती वजन आहे, कोणाचे संघटन किती घट्ट आहे आणि कोण शेवटपर्यंत निष्ठावंत राहतो, यावरच निकाल ठरणार आहे. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली असून गावागावात याच चर्चेचे वारे वाहताना दिसत आहेत.

धाराशिवच्या राजकारणात पुढील काही दिवस निर्णायक ठरणार आहेत. अध्यक्षपदावर कोणाचा झेंडा फडकणार? राणा दादा-शिंदे गट-तानाजी सावंत यांच्या एकत्रित समीकरणाने सत्ता स्थिरावणार, की अनपेक्षित टांगापलटी होणार? या प्रश्नांची उत्तरे लवकरच स्पष्ट होतील; पण सध्या तरी धाराशिव जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापलेले आहे आणि सत्तेचा हा महासंग्राम शिगेला पोहोचला आहे. लवकरच चित्र स्पष्ट होणार आहे!

# ताकविकी येथे जागतिक युनानी दिवस साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)-शासकीय युनानी दवाखाना ताकविकी जि. धाराशिव येथे बुधवार, दि. ११ फेब्रुवारी रोजी जागतिक युनानी दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून युनानी विशेषज्ञ तथा महाराष्ट्र युनानी मेडिकल संघटनेचे अध्यक्ष डॉ. शकील अहमद खान उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच छाया तरंगे, उपसरपंच अहेमद पठाण, अण्णा तरंगे, रियाज पठाण, असेफ पठाण, कुमार बायस व इतर जेष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमात युनानी चिकित्सा पद्धतीचे महत्त्व याबाबत विशेष माहिती देऊन रुग्णांना युनानी चिकित्सा पद्धतीचा उपयोग करण्या विषयी डॉ शकील खान सरांनी मार्गदर्शन केले.. यात एकूण २३० लोकांची तपासणी करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीमती गजधने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी औषधं निर्माण अधिकारी श्रीमती पवार, संदीप जगताप यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व योगाचे प्रात्यक्षिक श्रीमती घुटे यांनी केले.

# श्री कुलस्वामिनी माध्यमिक आश्रम शाळेचा स्वयंशासन दिन व राजर्षी शाहू महाविद्यालयाचा निरोप समारंभ साजरा



तुळजापूर (विजय पिसे)- तालुक्यातील जळकोट येथे दि.४ फेब्रुवारी २०२६ वार बुधवार रोजी श्री कुलस्वामिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा शाळेतील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय इयत्ता १२वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ जळकोटचे सचिव तथा प्राचार्य संतोष चव्हाण साहेब तर प्रमुख पाहूणे म्हणून प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय आशा पवार मॅडम, माध्यमिक आश्रम शाळेचे जेष्ठ शिक्षक नागेंद्र गुरव, श्रीमती शांताबाई चौगुले यांची उपस्थिती होती. पहिली ते सातवी व माध्यमिक आश्रमशाळेतील आठवी ते नववी वर्गास अध्यापनाचे कार्य केले. सकाळी परिपाठ ते सायंकाळी वंदे मातरम् गीता पर्यंत शाळा चालवली. प्राथमिक आश्रम शाळचे मुख्याध्यापिका नेहा एकनाथ राठोड, उपमुख्याध्यापक मल्लिनाथ हसनप्पा वासुदेव माध्यमिकचे आश्रम शाळेचे मुख्याध्यापक समाधान प्रल्हाद राठोड उपमुख्याध्यापिका शितल सुनिल चव्हाण म्हणून , प्राचार्य रणसुरे शुभांगी तर सेवक म्हणून युवराज यंपाळे, विष्णु आडे, राज उलमुलगे , जय पवार , सुरज कांबळे यांनी काम पाहिले. दहावी वर्गातील ६४ कॉलेज चे ३० विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणून भूमिका पार पाडली. यासाठी देवानंद पांढरे, बिळेणसिद्ध हक्के, सुरेश कोकाटे, संतोष दुधभाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्वयंशासन दिनाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावत उत्कृष्ट अध्यापन केले. त्यातील गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना विशेष क्रमांक देण्यात आले. प्रथम चव्हाण मोनिका रमेश, द्वितीय राठोड नेहा एकनाथ तर तृतीय क्रमांक राठोड कार्तिक विनायक यांना देण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण वातावरण अत्यंत भावनिक झाले होते. प्रत्येक शिक्षकांच्या डोळ्यात अश्रु होते. तर विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणी जपत भावूकपणे निरोप घेतला. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संतोष चव्हाण साहेब यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्षांना सामोरे जाण्यासाठी सुसंस्कार व शिक्षणाचे महत्व पटवून दिले. दहावी, बारावी विद्यार्थ्यांनी शाळेला एक संगणक संच भेट दिला. या कार्यक्रमाला अभिजीत चव्हाण, किरण ढोले , बाळासाहेब मुखम, आप्पासाहेब साबळे , खंडेराव कारले,किरण कांबळे, बालाजी राठोड, दुर्गेश कदम, श्रीमती लवंद कल्पना, कुंचगे प्रमिला, अश्विनी लबडे, कु. मयुरी कांबळे, सागर चव्हाण अमितसिंह खारे, शंकरराव चव्हाण, सुग्रीव देवकते, किसन पांचाळ, बालाजी अहंकारे, सिद्राम बनसोडे , श्रीमती बेबाबाई बुरुड, श्रीमती सुरताबाई चव्हाण उपस्थित होते.


## लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502

9175325708


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649